


महाराष्ट्र

# संरक्षित क्षेत्र वार्तापत्र

वन्यजीव संरक्षणविषयक घडामोडींचे त्रैमासिक

खंड ५, अंक ४ ऑक्टोबर २०२४ (क्र.१९)


## अनुक्रमणिका


**संपादकीय** 3

व्याघ्र संवर्धन केवळ निमित्त

**संरक्षित क्षेत्रातील बातम्या**

आंबोली दोडामार्ग संवर्धन राखीव क्षेत्र 4

सावंतवाडी, दोडामार्ग तालुक्यांमध्ये बेकायदा वृक्षतोडीला आळा घालण्यासाठी समिती

रबर, काजू लागवडीचा प्रदेशनिष्ठ बेडूक ‘आंबोली बुश फ्रॉगवर’ विपरीत परिणाम – संशोधनाचा निष्कर्ष

ताडोबा अंधारी व्याघ्र राखीव क्षेत्र 5

राज्य वन्यजीव मंडळाची ताडोबालगत खुल्या कोळसा खाणीच्या विस्ताराला मंजुरी

ताडोबा अंधारीच्या बफर क्षेत्रासह चिचपल्ली प्रादेशिक वनपरिक्षेत्रात हल्ले करणारी वाघीण जेरबंद

तानसा वन्यजीव अभयारण्य 6

गारगाई धरणाला वन व वन्यजीव विभागाकडून मंजुरी मिळवण्यासाठी मुंबई महानगरपालिका प्रयत्नशील

ताडोबा अंधारी व्याघ्र राखीव क्षेत्र / नवेगाव नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र 6

ताडोबा अंधारी व नवेगाव नागझिऱ्याला जोडणाऱ्या भ्रमणपट्ट्यात रेल्वे अपघातात वाघिणीचा मृत्यू

पेंच व्याघ्र राखीव क्षेत्र 7

पेंचला कुंपण घालण्याची शक्यता अभ्यासण्याचे राज्याच्या वन मंत्र्यांचे निर्देश

पेंच क्षेत्रात चुकीने वेगळाच वाघ जेरबंद; नियमांचे उल्लंघन केल्याचा वन विभागावर आरोप

पेंचमध्ये वाघाच्या हल्ल्यात महिलेचा मृत्यू, संतप्त ग्रामस्थांचा वन कर्मचाऱ्यांवर हल्ला

पेंचमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित ‘आभासी’ कुंपण कार्यान्वित

बोर व्याघ्र राखीव क्षेत्र 9

बोर व्याघ्र राखीव क्षेत्रात ‘पीपल्स फॉर ॲनिमल्स’च्या बचाव केंद्रातील काळवीटे मुक्त

बोर व्याघ्र राखीव क्षेत्रात चार नव्या वाघांची नोंद

भीमाशंकर वन्यजीव अभयारण्य 10

भीमाशंकर अभयारण्यात १९५ वर्षांनी दिसले रानकुत्रे

संजय गांधी राष्ट्रीय उद्यान 10

आरे दुग्ध वसाहतीत आदिवासी बचाव यात्रा

सह्याद्री व्याघ्र राखीव क्षेत्र 11

सह्याद्री-कोकण भ्रमणमार्ग प्रदेशात ३२ वाघ; पैकी १० वाघ महाराष्ट्रातील

**प्रादेशिक बातम्या**

विदर्भ 11

विजेच्या धक्क्याने होणारे वाघांचे मृत्यू रोखण्याबाबत वन मंत्र्यांचे निर्देश

मुल शहरालगत असलेल्या जंगलात वाघाच्या हल्ल्यात शेळीपालकाचा मृत्यू

गोंदिया जिल्ह्यातील सारस पक्ष्यांच्या संख्येत घट

पश्चिम महाराष्ट्र 13

शेतमजुरांनी शिकार केली तर संबंधित शेतकऱ्यावरही कारवाई करणार – सांगली जिल्ह्यातील सावळज ग्रामपंचायतीचा इशारा

कोकण 13

ठाणे जिल्ह्यात ९०५ दावेदारांचे वन हक्क मंजूर

पालघर जिल्ह्यात वन हक्कांना मंजुरी देण्यात तांत्रिक अडचणी; ‘श्रमजीवी संघटने’ने केले आंदोलन

मुंबईसह ठाणे व रायगड जिल्ह्यांत कांदळवनावर लक्ष ठेवण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे

माणूस-बिबट्या 15

संगमनेर तालुक्यात तीन महिन्यात बिबट्यांच्या हल्ल्यांत तीन व्यक्ती ठार

गिरडा वन वर्तुळात बिबट्याच्या हल्ल्यात शेतकऱ्याचा मृत्यू; सप्टेंबर महिन्यात दहा दिवसांत पाच बिबटे जेरबंद

चंद्रपूर जिल्ह्यातील दुर्गापुरात सात वर्षीय मुलाला बिबट्याने उचलून नेले

बिबट्यापासून स्वसंरक्षणासाठी जुन्नर तालुक्यातील शेतकऱ्यांची कर्ज काढून उपाययोजना; आठ महिन्यांत बिबट्यांच्या हल्ल्यांत पाच मृत्यू

जुन्नर वन विभागात सुमारे ५०० बिबटे – वन विभागाची माहिती

माणूस-बिबट्या संक्षिप्त वृत्त 18

**राज्यस्तरीय बातम्या** 19

राज्यातील ७० वनपरिक्षेत्रांमध्ये मुख्य अधिकाऱ्यांच्या जागा रिक्त

**राष्ट्रीय बातम्या** 19

व्याघ्र राखीव क्षेत्रातील आदिवासींच्या पुनर्वसनाला गती देण्याच्या निर्णयाला देशभरातून विरोध

व्याघ्र प्रकल्पातील लोकांच्या स्थलांतराबाबत NTCA ची भूमिका बेकायदा – जाणकारांचे मत

लोकसभा निवडणुकीनंतर राष्ट्रीय वन्यजीव मंडळाच्या पहिल्याच बैठकीत संरक्षित क्षेत्रांतील अनेक प्रकल्पांना मंजुरी

**आंतरराष्ट्रीय बातम्या** 22

गेल्या ५० वर्षांत विविध परिसंस्थांमधील वन्यजीवांच्या संख्येत सरासरी ७३% घट

**थोडक्यात पण महत्त्वाचे** 24

संवर्धनाचा अर्थ नव्याने समजून घेताना...

**महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र**

**खंड ५, अंक ४, ऑक्टोबर २०२४ (क्र. १९)**

संपादकः रेश्मा जठार

सहाय्यक संपादकः पंकज सेखसरीया

सहाय्यकः राधिका अघोर

शीर्षक व रेखाचित्रे (प्रामुख्याने): अश्विनी मेनन Visual Design Studio

इतर काही रेखाचित्रेः सिद्धी जाधव, श्रुती कुलकर्णी, मधुवंती अनंतराजन, पीयूष सेखसरीया

प्रकाशकः कल्पवृक्ष

**संपादकीय पत्ता**:C/o कल्पवृक्ष, अपार्टमेंट ५, श्री दत्त कृपा, ९०८, जिमखाना, पुणे ४११००४, महाराष्ट्र, भारत.

**दूरभाष/फॅक्स**: ०२० २५६५४२३९ **ई मेल**:marathipaupdate@gmail.com

**संकेतस्थळ**:https://kalpavriksh.org/documentation-outreach/newsletters/

***

टीपः 'महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा'त प्रकाशित बातम्या या त्या त्या बातमीखाली दिलेल्या मूळ प्रकाशनातील बातम्यांवर संपादकीय सोपस्कार करून प्रकाशित केलेल्या आहेत.

***

'महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा'च्या प्रकाशनासाठी अर्थसाहाय्य

**Duleep Matthai Nature Conservation Trust**

C/o **Foundation for Ecological Security** http://fes.org.in/

**Paul Hamlyn Foundation**

आणि

**अनेक हितचिंतकांच्या वैयक्तिक देणग्या**

## संपादकीय

### व्याघ्र संवर्धन केवळ निमित्त

भारतातील आदिवासी आणि इतर वनाधारित पारंपरिक लोकसमूहांना मुख्य प्रवाहात सामील व्हायचे किंवा नाही याविषयी निर्णय घेण्याची संधी अनेक ऐतिहासिक कारणांमुळे कधी मिळालीच नाही. वने आणि वन्यजीवांसाठी संरक्षित क्षेत्रांमध्ये पूर्वापार वसलेल्या आदिवासी व इतर वनाधारित पारंपरिक लोकसमूहांचा बाजारपेठेशी, अर्थव्यवस्थेशी संबंध येत असला तरीही ते मुख्य प्रवाहात आहेत असे म्हणता येत नाही. कारण मुख्य प्रवाहात असण्याचे म्हणून गृहित धरलेले किमान फायदे जसे की शेतीतून अन्नोत्पादन किंवा बाजारातून पुरेसे, पौष्टिक अन्न खरेदी करण्याची क्रयशक्ती, घर, वीज, आरोग्यसेवा, औपचारिक शिक्षण आदी यांच्या वाट्याला सहजी किंवा अनेकांच्या बाबतीत कधीच आले नाहीत.

मूळ निवासींवरील ऐतिहासिक अन्याय दूर करण्याची भूमिका जाहीर करून २००६ मध्ये वन हक्क कायदा लागू करण्यात आला. त्याला १८ वर्षे उलटून गेल्यानंतरही या लोकसमूहांचा संघर्ष संपलेला नाही. वन हक्क कायद्याच्या अंमलबजावणीच्या प्रत्येक टप्प्यावर तो सुरू आहे आणि त्याची पुनःप्रचीती आता 'राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण' – NTCA च्या जुलै महिन्यातील निर्देशाने आली आहे. NTCA ने व्याघ्र राखीव क्षेत्रांतून आदिवासी व इतर वनाधारित पारंपरिक लोकसमुदायांना बाहेर काढण्याच्या प्रक्रियेला गती देण्यास संबंधित राज्य सरकारांना सांगितले आहे. वन्यजीव, प्रामुख्याने व्याघ्र संवर्धनात हे लोक अडथळा ठरतात असे गृहितक या निर्देशामागे आहे.

हे गृहितक बरोबर की चूक हा स्वतंत्र चर्चेचा आणि क्लिष्ट विषय आहे. पण इथे निव्वळ युक्तीवादापुरते मानू की या गृहितकात पुरेसे तथ्य आहे; तर मग व्याघ्र राखीव क्षेत्रांत खाणकाम, रस्ते रुंदीकरण, रेल्वेमार्ग, विलासी पर्यटन सुविधांसाठी बांधकाम आदींमुळे व्याघ्र संवर्धनात अडथळे निर्माण होतात हे तर वेळोवेळी दिसून आले आहे. ताज्या उदाहरणादाखल प्रस्तुत अंकातील दोन बातम्या पाहा – 'राज्य वन्यजीव मंडळाची ताडोबालगत खुल्या कोळसा खाणीच्या विस्ताराला मंजुरी' आणि 'ताडोबा अंधारी व नवेगाव नागझिऱ्याला जोडणाऱ्या भ्रमणपट्ट्यात रेल्वे अपघातात वाघिणीचा मृत्यू'. तरीदेखील व्याघ्र राखीव क्षेत्रात, वाघांचा नियमित संचार असलेल्या भ्रमणमार्गांमध्ये अशा प्रकल्पांना मंजुरी का दिली जाते?

देशाची अर्थव्यवस्था व पायाभूत सुविधांच्या विकासासाठी हे प्रकल्प आहेत, असा युक्तीवाद केला जातो. हे या युक्तीवादापुरतेच मान्य करून इतर प्रकल्पांकडे वळू. जवळपास प्रत्येक व्याघ्र राखीव क्षेत्रात होणारे, वाढत चाललेले पंचतारांकित व्याघ्र पर्यटन कोणाच्या हितासाठी आहे? अशा प्रकारच्या प्रकल्पांच्या उभारणीस व्याघ्र अधिवासात परवानगी का दिली जाते?

व्याघ्र राखीव क्षेत्रात वनवासी राहात असतानाही देशात वाघांची संख्या वाढली आहे. कमी होत आहे तो वाघांचा अधिवास. ग्रामीण लोकवस्ती व्याघ्र राखीव क्षेत्रात राहिल्यामुळे होणारा अधिवासाचा ऱ्हास अधिक की खाणकाम, रेषीय प्रकल्प, व्याघ्र पर्यटनासाठी उभारलेल्या पंचतारांकित सुविधा, पर्यटकांची वाढती संख्या त्यामुळे नैसर्गिक अधिवासावर येणारा वाढता ताण इत्यादी कारणांमुळे होणारा अधिवासाचा ऱ्हास अधिक?

NTCA च्या पत्रामुळे वनवासी लोकसमूहांच्या पुनर्वसनासंदर्भातील इतर पक्षपाती बाबीही पुन्हा एकदा उजेडात आल्या आहेत. पत्रात 'पुनर्वसना'ला गती देण्याचा आदेश असला तरी प्रत्यक्षात लोकसमूहांना व्याघ्र राखीव क्षेत्रातून बाहेर काढण्यापर्यंतची प्रक्रिया वेगाने होते. ते एकदा झाले की पुनर्वसनाच्या कायदेशीर निकषांची पूर्तता मात्र वर्षानुवर्षे रखडते. नव्या ठिकाणी आवश्यक सोयीसुविधा, ठरलेली नुकसानभरपाई/मोबदला देणे यांची पूर्तता तब्बल २५ वर्षांनंतरही झालेली नाही, अशी प्रकरणे आपल्यासमोर आहेत. पुनर्वसनासाठी दिलेले क्षेत्र वनजमीन असेल तर तिचे महसूल खात्याकडे हस्तांतरण करून महसुली जमिनीचा

दर्जा देण्याची प्रक्रिया सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतरही अनेक ठिकाणी झालेली नाही. परिणामी, पुनवर्सित कुटुंबांना कल्याणकारी योजनांचे लाभ लागू झालेले नाहीत. याबाबतीत NTCA आणि संबंधित सरकारी विभाग काय करणार?

हे प्रश्न नवे नाहीत; ते केवळ NTCA च्या आदेशामुळे पुन्हा एकदा समोर आले आहेत. एरवी ते पूर्वीपासूनच नजरेआड 'केलेले' प्रश्न आहेत.

***

## संरक्षित क्षेत्रातील बातम्या

### आंबोली दोडामार्ग संवर्धन राखीव क्षेत्र

**सावंतवाडी, दोडामार्ग तालुक्यांमध्ये बेकायदा वृक्षतोडीला आळा घालण्यासाठी समिती**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग आणि सावंतवाडी तालुक्यांमधील १२ गावांमध्ये वृक्षतोडीवर बंदी घालण्यात आली आहे. बेकायदा वृक्षतोडीला आळा घालण्यासाठी कृती दल समिती स्थापन करण्यात आली आहे. समितीत महसूल, वन आणि पोलीस अधिकाऱ्यांचा समावेश आहे. समितीचे अध्यक्ष सावंतवाडी वन विभागाचे उपविभागीय अधिकारी आहेत.

दोडामार्ग तालुक्यातील गावात खासगी मालकीच्या किंवा शासकीय क्षेत्रात वृक्षतोड होताना किंवा झाल्याचे आढळले तर जनतेने गावातील पोलिसपाटील किंवा वनरक्षक, तलाठी यांना कळवावे. वृक्षतोडीबाबत ऑनलाईन तक्रार नोंदवता यावी यासाठी सावंतवाडी दोडामार्ग कृती दल समितीकडे दूरध्वनीवर किंवा ई-मेलद्वारे सावंतवाडी वन विभागाकडे वृक्षतोडीबाबत तक्रार दाखल करता येईल. ई-मेल – sdtfsawantwadi@gmail.com

**स्रोत** – 'अवैध वृक्षतोड बंदीसाठी वन विभागाकडून टास्क फोर्स, सावंतवाडी, दोडामार्ग तालुक्यांतील बारा गावांत बंदी', www.lokmat.com, २१.१०.२०२४.

**रबर, काजू लागवडीचा प्रदेशनिष्ठ बेडूक 'आंबोली बुश फ्रॉग'वर विपरीत परिणाम – संशोधनाचा निष्कर्ष**

आंबोलीसह सह्याद्रीत इतरत्रही आढळणाऱ्या बेडकाच्या सह्याद्रीतील प्रदेशनिष्ठ प्रजाती 'आंबोली बुश फ्रॉग'वर रबर आणि काजू लागवडीचा विपरीत परिणाम होत असल्याचे संशोधनात दिसून आले आहे. 'नेचर कॉन्झर्वेशन फाउण्डेशन'चे संशोधन हिमांशु लाड, निनाद गोसावी, जितीन विजयन आणि डॉ. रोहित नानिवडेकर यांचा या विषयीचा शोधनिबंध 'ॲनिमल कॉन्झर्वेशन' या विज्ञानपत्रिकेत प्रकाशित झाला आहे.


जंगलात आढळणाऱ्या आंबोली बुश फ्रॉगच्या तुलनेत रबर लागवडीत आढळणाऱ्या याच बेडकाचा आकार ५ टक्क्यांनी लहान असल्याचे या संशोधनात स्पष्ट झाले आहे. तसेच रबर लागवडीत नर मादी बेडकांचे गुणोत्तरही १०० नरांमागे केवळ तीन प्रौढ मादी असे आढळले आहे. काजू बागायतीत या बेडकाची संख्या खूप कमी असल्यामुळे व त्यातही किशोरवयीन बेडकांची संख्या कमी असल्यामुळे या प्रजातीच्या प्रजननासाठी काजू बागायती हा अधिवास योग्य नसल्याचे या अभ्यासात दिसून आले आहे. त्यामुळे अशा लागवडी या प्रजातीसाठी घातक असल्याचे समोर आले आहे.

IUCN च्या धोकाग्रस्त वन्यजीवांच्या यादीत आंबोली बुश फ्रॉगचा समावेश 'लीस्ट कन्सर्न' म्हणजे धोका नसलेल्या गटात केलेला आहे. मात्र, नवे संशोधन पाहता या प्रदेशनिष्ठ प्रजातीचे पुन्हा मूल्यांकन करण्याची गरज डॉ. नानिवडेकर यांनी व्यक्त केली आहे.

**स्रोत** – अक्षय मांडवकर. 'रबर, काजू लागवडीमुळे आक्रसला आंबोलीतील बेडकांचा आकार; जंगलतोडीचा उभयचरांवर परिणाम', www.mahamtb.com, १४.१०.२०२४.

## ताडोबा अंधारी व्याघ्र राखीव क्षेत्र

### राज्य वन्यजीव मंडळाची ताडोबालगत खुल्या कोळसा खाणीच्या विस्ताराला मंजुरी



महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळ -SBWL ने वेस्टर्न कोलफील्ड लिमिटेड (WCL) ला चंद्रपूर जिल्ह्यातील वाघांच्या भ्रमणपट्ट्यात असलेल्या दुर्गापूर इथे जमिनीच्या पृष्ठभागावर कोळसा खाणीला मंजुरी दिली आहे. तशा आशयाचे शिफारस पत्र राज्य शासनाने १९ जून रोजी केंद्रीय पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाला पाठवले आहे. प्रस्तावित खाण ताडोबा अंधारी व्याघ्र राखीवलगत असून ताडोबा-टिपेश्वर-कवल या व्याघ्र अधिवासांना जोडणाऱ्या वाघांच्या भ्रमणपट्ट्यात आहे. त्यामुळे या खाणकामासाठी वन्यजीव मंजुरी घेणे बंधनकारक आहे.

खाणकामाच्या प्रस्तावात आधीपासून कार्यान्वित असलेल्या खाणीच्या विस्तारासाठी ८०.७७ हेक्टर राखीव वन क्षेत्राची मागणी केली आहे. वन अधिनियम १९८० अंतर्गत चंद्रपूर वन विभागातील कक्ष क्रमांक ४०० व ४०१ मध्ये हे क्षेत्र आहे. लक्ष्यित १५.२० दशलक्ष टन कोळशापैकी ७.२० दशलक्ष टन कोळशाचे उत्खनन २००५ ते २०१३ या कालावधीत आठ वर्षांसाठी वन विभागाकडून परवानगी मिळाल्यानंतर झाले आहे. आता उर्वरित ८ दशलक्ष टन कोळसा खणून काढण्यासाठी खाणीच्या विस्ताराचा नवा प्रस्ताव असल्याचे WCL ने म्हटले आहे.

राज्यातील विधानसभा निवडणुकीपूर्वी SBWL ची बैठक आयोजित करून या २३ व्या बैठकीत WCL च्या खाणीच्या प्रस्तावाला तात्काळ मंजुरी दिल्याचे वृत्तात नमूद केले आहे. या प्रकल्पाला विरोध करू नये, अशा आगाऊ सूचना असल्याचे वृत्तात म्हटले आहे. वाइल्डलाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया (WII) ने खाणकामाच्या वन्यजीवांवर होणाऱ्या दुष्परिणामांची तीव्रता कमी करण्यासाठी सुचवलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याच्या अटीवर राज्याच्या प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्यजीव) यांनी खाणकामाला मंजुरी देण्याची शिफारस केली. तसेच, WCL ला प्रकल्पाच्या एकूण ४५.५१ कोटी रुपये किमतीच्या २% रक्कम म्हणजे ९१ लाख रुपये 'ताडोबा फाउण्डेशन'कडे जमा करण्यास सांगितले आहे.

या खाणीसाठी झाडे आणि बांबूची मोठी बेटे तोडावी लागणार आहेत, त्यामुळे वाघांच्या भ्रमणमार्गातील वन्य अधिवासाचा मोठा ऱ्हास होणार आहे, असे सांगून पर्यावरणीय कार्यकर्त्यांनी खाणकामाला विरोध दर्शवला आहे. तसेच, खाणीचे प्रस्तावित क्षेत्र चपराळा वन्यजीव अभयारण्य आणि पुढे छत्तीसगढमधील इंद्रावती व्याघ्र प्रकल्पाला जोडणाऱ्या वन्य अधिवासात आहे. खेरीज, चंद्रपुरातील माणूस-वन्यजीव संघर्षाची वाढती तीव्रता पाहता वन जमिनीचा इंचनइंच भाग राखणे महत्त्वाचे आहे, या बाबींकडे त्यांनी लक्ष वेधले आहे.

**स्रोत** – विजय पिंजरकर. 'Coal Over Conservation: State Wildlife Board Okays Mining in Chandrapur Tiger Corridor, www.timesofindia.indiatimes.com, २७.०८.२०२४.

### ताडोबा अंधारीच्या बफर क्षेत्रासह चिचपल्ली प्रादेशिक वनपरिक्षेत्रात हल्ले करणारी वाघीण जेरबंद

ताडोबा अंधारी व्याघ्र राखीव क्षेत्राच्या बफर क्षेत्रातील मुल वनपरिक्षेत्र आणि चंद्रपूर वन विभागातील प्रादेशिक चिचपल्ली वनपरिक्षेत्रात माणसांवर हल्ले करणाऱ्या टी-८३ वाघिणीला वन विभागाने जेरबंद केले. तिला चंद्रपुरातील तात्पुरत्या बचाव केंद्रात ठेवले असून लवकरच नागपुरातील

गोरेवाडा प्राणिसंग्रहालयात पाठवणार असल्याचे वृत्तात नमूद केले आहे.

चिचपल्ली वनपरिक्षेत्रातीव जानाळा, कांतापेठ, चिरोली, कवडपेठ, चिचाळा, ताडाळा परिसरात या वाघिणीच्या हल्ल्यात किमान चार गुराख्यांचा मृत्यू झाला. त्यामुळे या परिसरात वाघिणीची दहशत पसरली होती. वाघिणीला जेरबंद करण्याचे आदेश वन विभागाने २३ सप्टेंबर रोजी जारी केले होते. अखेर शीघ्र प्रतिसाद दलाने २८ सप्टेंबर रोजी पहाटे ५.३० वाजताच्या सुमारास जानाळा नियतक्षेत्रातील कक्ष क्रमांक ७१७ मध्ये जेरबंद केले.

**स्रोत** – 'पाच गुराख्यांचा बळी घेतला, अखेर शार्प शुटरने पहाटेच…' www.loksatta.com, २८.०९.२०२४.
Mazhar Ali. 'Tigress responsible for multiple human kills captured in Chandrapur', timesofindia.indiatimes.com, २९.०९.२०२४.

## तानसा वन्यजीव अभयारण्य

### गारगाई धरणाला वन व वन्यजीव विभागाकडून मंजुरी मिळवण्यासाठी मुंबई महानगरपालिका प्रयत्नशील

मुंबई महानगरपालिकेने शहराची पाण्याची वाढती मागणी लक्षात घेऊन गारगाई धरण प्रकल्पाला गती देण्याचा निर्णय घेतला आहे. गारगाई धरणासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड करावी लागणार आहे. या प्रकल्पामुळे तानसा अभयारण्यातील अधिवासाचा ऱ्हास होणार असून वन्यजीवन बाधित होणार आहे.

या प्रकल्पासाठी अन्य सर्व परवानग्या मिळाल्या आहेत, मात्र वन विभाग आणि वन्यजीव विभागाची परवानगी मिळालेली नाही. त्याकरता महानगरपालिकेने २०२० मध्ये अर्ज केला आहे. त्यावर सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याचे महानगरपालिका अधिकाऱ्यांनी सांगितले.


सात धरणांमधून मुंबईला दररोज ३,९५० दशलक्ष लीटर पाण्याचा पुरवठा करण्यात येतो. २०४१ पर्यंत मुंबईकरांना ५,९४० दशलक्ष लीटर पाण्याची गरज भासणार आहे. पाण्याची गरज लक्षात घेऊन पालिकेने गारगाई, पिंजाळ, दमणगंगा या तीन प्रकल्पांचे नियोजन केले आहे. गारगाई धरण बांधल्यानंतर ४४० दशलक्ष लीटर पाणी उपलब्ध होऊ शकणार आहे.

(संबंधित वृत्त पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र* खंड ५, अंक १ व अंक २)

**स्रोत** – 'गारगाई धरण प्रकल्प रखडणार', www.loksatta.com, ०३.१०.२०२४.

## ताडोबा अंधारी व्याघ्र राखीव क्षेत्र / नवेगाव नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र

### ताडोबा अंधारी व नवेगाव नागझिऱ्याला जोडणाऱ्या भ्रमणपट्ट्यात रेल्वे अपघातात वाघिणीचा मृत्यू



बल्लारशा-गोंदिया रेल्वेमार्गावर १२ ऑगस्ट रोजी पहाटे एका वाघिणीला मालगाडीची जोरदार धडक बसली. या धडकेत तिचा जागीच मृत्यू झाला. ताडोबा अंधारी, नवेगाव नागझिरा या व्याघ्र राखीव क्षेत्रांना जोडणारा हा वन्य प्राण्यांचा भ्रमणमार्ग आहे.


वडसा आणि गोंदिया वन विभागांच्या सीमेजवळ वडसा वन विभागात गांधीनगरजवळ कक्ष क्र. ९७ मध्ये हा अपघात झाला. साधारण तीनचार वर्षे वयाची ही वाघीण रेल्वेरूळ ओलांडत होती. या रेल्वेमार्गावर वाघ, बिबट्यासह इतरही वन्य प्राण्यांचे सातत्याने मृत्यू होत आहेत. या

रेल्वेमार्गावरुन भरधाव वेगाने मालगाडीसह इतरही रेल्वेगाड्या धावतात.

**स्रोत** – 'वाघीण आणि रेल्वे समोरासमोर, मग जे घडले...' www.loksatta.com, १२.०८.२०२४.

## पेंच व्याघ्र राखीव क्षेत्र

### पेंचला कुंपण घालण्याची शक्यता अभ्यासण्याचे राज्याच्या वनमंत्र्यांचे निर्देश



पेंच व्याघ्र राखीव क्षेत्रालगत असलेल्या गावांमध्ये साधारणपणे जुलै महिन्यापासून पाळीव जनावरे आणि ग्रामस्थांवर वाघांचे हल्ले होण्याच्या घटना वाढल्या आहेत. या परिसरातील माणूस वाघ संघर्षाच्या घटनांना आळा घालण्यासाठी पेंच व्याघ्र राखीव क्षेत्राला कुंपण घालता येईल का, ही शक्यता अभ्यासण्याचे निर्देश राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी वनाधिकाऱ्यांना दिले आहेत.

नागपूर जिल्ह्यात विविध ठिकाणी होत असलेल्या वाघांच्या हल्ल्यांचे प्रमाण पाहता त्यावर उपाययोजनांबाबत चर्चा करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात वन मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. त्यामध्ये वन मंत्र्यांनी हे निर्देश दिले. बैठकीला प्रधान मुख्य वन संरक्षक (वन बल प्रमुख) शोमिता बिश्वास, अप्पर प्रधान मुख्य वन संरक्षक विवेक खांडेकर, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, जिल्हा पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार, आमदार आशिष जयस्वाल, माजी आमदार मल्लिकार्जुन रेड्डी, पेंच व्याघ्र राखीवचे उपसंचालक डॉ. प्रभूनाथ शुक्ल आदी उपस्थित होते.

मात्र, पेंच व्याघ्र राखीव क्षेत्राला कुंपण घालण्याची कल्पना निरुपयोगी ठरेल, असे वन्यजीव तज्ञांचे मत आहे. उत्तर प्रदेशातील पिलीभीत व्याघ्र राखीव क्षेत्रात २०१९-२० मध्ये केलेला कुंपण घालण्याचा प्रयोग फसल्याकडे त्यांनी लक्ष वेधले आहे. तसेच, राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण – NTCA च्या मार्गदर्शक सूचनांमध्ये कुंपण घालणे शहाणपणाचे नसल्याचे म्हटले आहे. कुंपणामुळे वन्य प्राण्यांच्या संचारावर मर्यादा येते आणि त्यातून पुढे त्याच त्या प्राण्यांमध्ये प्रजनन होऊन जनुकीय विविधतेचा ऱ्हास, मोठ्या मांसाहारी प्राण्यांमध्ये हद्द प्रस्थापित करण्यासाठी होणाऱ्या झुंजींमध्ये वाढ आदी समस्या उद्भवतात, असे नमूद केले आहे.

दरम्यान, असा कोणताही अभ्यास करण्याआधीच पेंचमधील बांद्रा नियतक्षेत्रात 'चेन-लिंक' प्रकारचे कुंपण घातले असून पवनी एकसंघ बफर क्षेत्रात कुंपण घालण्याचे काम सुरू असल्याचा दावा वृत्तात केला आहे.

बैठकीत अन्य संबंधित मुद्द्यांवरही चर्चा झाली. माणूस-वन्यजीव संघर्ष अधिक आहे अशा गावांमधील प्रत्येकी एक व्यक्ती आणि वन विभाग यांनी एकत्र बसून समन्वय समिती तयार करावी; या समितीने मृत्यूच्या घटना शून्यावर आणण्यासाठी प्रयत्नशील राहावे, प्राथमिक प्रतिसाद दल स्थापन करावे. प्रत्येक गावातील दोन तरुणांची निवड करुन त्यांना प्रशिक्षण द्यावे आणि त्यांचा या दलात समावेश करावा, स्वसंरक्षणासाठी त्यांना आवश्यक साहित्य द्यावे आणि मानधन तत्त्वावर नियुक्त करावे, असे निर्देश मुनगंटीवार यांनी दिले.

पारशिवनी तालुक्यातील एक शेतकरी १८ सप्टेंबर रोजी वाघाच्या हल्ल्यात जखमी झाला. त्याला प्राथमिक आरोग्य केंद्रात योग्य उपचार मिळाले नाहीत, या पार्श्वभूमीवर मुनगंटीवार यांनी प्राथमिक आरोग्य केंद्रांतील डॉक्टरांना वाघाच्या हल्ल्यात जखमी झालेल्यांवर औषधोपचार करण्यासाठी प्रशिक्षण देण्याची सूचना केली.

रामटेक तालुक्यातील १५० हून अधिक लोक - पैकी ९०% मासेमार - बैठकीला उपस्थित होते. पेंचच्या

गाभा क्षेत्रातील तोतलाडोह जलाशयात मासेमारी करण्याची परवानगी मिळावी, अशी त्यांची मागणी आहे.

**स्रोत** – 'मुनगंटीवार म्हणतात, जंगलातील वाघांना स्थलांतरित करा', www.loksatta.com, २६.०९.२०२४.
विजय पिंजरकर. 'Mungantiwar calls for fencing Pench reserve', www.timesofindia.indiatimes.com, २५.०९.२०२४.

### पेंच क्षेत्रात चुकीने वेगळाच वाघ जेरबंद; नियमांचे उल्लंघन केल्याचा वन विभागावर आरोप

पेंच व्याघ्र राखीव क्षेत्रात गेल्या वर्षभरात वाघाच्या हल्ल्याच्या घटनांमध्ये काही ग्रामस्थांचा मृत्यू झाला तर काही जखमी झाले. हल्ले करणाऱ्या वाघाला जेरबंद करण्याची परवानगी राज्याच्या प्रधान मुख्य वन संरक्षकांनी दिली. मात्र, त्या वाघाऐवजी पेंच प्रशासनातील अधिकाऱ्यांनी वेगळ्या एका वाघाला जेरबंद केले. हल्ले करणाऱ्या वाघाचा एक कान तुटका आहे. त्यामुळे जेरबंद केलेला वाघ तो नसल्याचे लक्षात आले.

वाघाला जेरबंद करताना वन्य प्राण्याला जेरबंद करण्याबाबत नियमांचे उल्लंघन झाल्याचे वृत्तात नमूद केले आहे. नियमानुसार सूर्योदयानंतर आणि सूर्यास्ताच्या आधी वन्य प्राणी जेरबंद करावा लागतो. २१ सप्टेंबर रोजी मात्र वाघाला सायंकाळी साडेसात-आठ वाजताच्या दरम्यान जेरबंद करण्यात आले. पेंच व्याघ्र राखीव क्षेत्राचे उपसंचालक डॉ. प्रभुनाथ शुक्ल यांनी प्रधान मुख्य वन संरक्षकांच्या परवानगीने सायंकाळी वाघाला जेरबंद केल्याचे सांगितले. मात्र, त्यांनी वेळ सांगितली नाही. काही प्रसारमाध्यमांना त्यांनी सायंकाळी साडेपाच वाजता वाघाला जेरबंद केल्याचे सांगितल्याचा दावा वृत्तात केला आहे.

वाघ जर साडेपाच वाजता जेरबंद केला तर त्याला गोरेवाडा बचाव केंद्रात आणायला रात्री बारा वाजताची वेळ का निवडली, वाघाला जेरबंद करण्यासाठी त्यांनी गोरेवाडा इथल्या केंद्रातील पशुवैद्यकीय अधिकाऱ्याची मदत का घेतली, एरवी त्वरित प्रसारमाध्यमांना तपशील उपलब्ध करून देणाऱ्या पेंच प्रशासनाने या घटनेचा तपशील मध्यरात्री का पाठवला, असे प्रश्न उपस्थित झाले आहेत.

**स्रोत** – 'वाघाच्या जेरबंदीवरून वनखाते अडचणीत? नियमांचे उल्लंघन,' www.loksatta.com, २२.०९.२०२४.

### पेंचमध्ये वाघाच्या हल्ल्यात महिलेचा मृत्यू, संतप्त ग्रामस्थांचा वन कर्मचाऱ्यांवर हल्ला



पेंच व्याघ्र राखीव क्षेत्रातील झिंझिरया गावातील महिलेचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी पोहोचले, तेव्हा संतप्त ग्रामस्थांनी त्यांच्यावर हल्ला केला. सप्टेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात ही घटना घडली.

ग्रामस्थांनी केलेल्या हल्ल्यात पेंच व्याघ्र राखीव क्षेत्रातील काही वनरक्षक गंभीर तर काही किरकोळ जखमी झाले. जमावाला शांत करण्यासाठी वन विभागाने स्थानिक पोलिसांची मदत घेतली. स्थानिक लोकांचा आक्रोश लक्षात घेत पोलीस अधीक्षक नागपूर (ग्रामीण), उपसंचालक, पेंच व्याघ्र राखीव, उपविभागीय अधिकारी रामटेक व उपविभागीय पोलिस अधिकारी पारशिवनी/रामटेक यांनी स्थानिक ग्रामस्थांशी चर्चा केली.

अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी या परिसरात वन विभागाचे कर्मचारी, प्राथमिक प्रतिसाद दल

गस्त घालत आहे. तसेच या भागामध्ये स्वयंचलित कॅमरे लावण्यात आले असून जागोजागी मचाणे बांधण्यात आली आहेत. ग्रामस्थांना सावधगिरी बाळगण्याच्या सूचना दिल्या आहेत. वाघाला जेरबंद करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणा- (NTCA) -च्या मार्गदर्शक तत्त्वानुसार समिती गठीत करण्यात आली आहे.

**स्रोत** – 'संतप्त गावकऱ्यांचा वनकर्मचाऱ्यांवर हल्ला, काय आहे प्रकरण?' www.loksatta.com, १८.०९.२०२४.

### पेंचमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित 'आभासी' कुंपण कार्यान्वित

पेंच व्याघ्र राखीव क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) तंत्रज्ञानावर आधारित वन्यजीव निरीक्षणासाठी 'आभासी' (virtual) कुंपण कार्यान्वित करण्यात आले आहे. यापूर्वी ताडोबा अंधारी व्याघ्र राखीव क्षेत्रात कार्यान्वित केलेल्या आभासी कुंपणाचे आश्वासक परिणाम दिसू लागले आहेत. संवेदक (सेन्सर) बसवल्यापासून माणूस-वन्यजीव संघर्षाच्या घटना नोंदवण्याचे प्रमाण कमी होत असल्याचे निरीक्षण तिथल्या वनरक्षकांनी नोंदवले आहे.

आभासी कुंपण ही कॅमेऱ्यांची एक साखळी असून ती जंगल आणि गावाच्या सीमेवर एकमेकांशी जोडलेली आहे. गावाच्या सभोवताली असलेल्या आभासी कुंपणाच्या आत वन्य प्राणी शिरताच एकीकडे वन विभागाला त्याची माहिती मिळते तर दुसरीकडे गजर वाजल्यामुळे ग्रामस्थांनाही वन्य प्राणी गावाजवळ आल्याची सूचना मिळते. आगाऊ सूचनेमुळे पाळीव जनावरांवर होणारे हल्ले, शेतपिकांचे नुकसान टाळणे शक्य होईल, तसेच या प्रणालीमुळे व्याघ्र राखीव क्षेत्रात बेकायदा प्रवेश, शिकारीच्या उद्देशाने होणाऱ्या घुसखोरीला आळा घालणे शक्य होईल, अशी वन विभागाची अपेक्षा आहे.

पेंच प्रशासनाने हे कॅमेरे विशेष पद्धतीने बनवून घेतले आहेत, जेणेकरुन गरजेनुसार ज्या भागात माणूस प्राणी संघर्षाच्या घटना अधिक आहेत तिथे त्यांचा वापर करता येईल. कॅमेऱ्यांची साखळी एकाच ठिकाणी कायमस्वरूपी ठेवण्याऐवजी ठिकठिकाणी ते वापरता येणार असल्याने खर्च कमी होईल, असे वृत्तात म्हटले आहे.

(पूर्वीचे संबंधित वृत्त पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र* खंड ५ अंक २, खंड ५ अंक ३)

**स्रोत** – 'वन्यप्राण्यांना रोखणार 'आभासी भिंत'; पेंचमध्ये मानव-वन्यजीव संघर्ष', www.loksatta.com, २६.०८.२०२४.

## बोर व्याघ्र राखीव क्षेत्र

### बोर व्याघ्र राखीव क्षेत्रात 'पीपल्स फॉर ॲनिमल्स'च्या बचाव केंद्रातील काळवीटे मुक्त



बोर व्याघ्र राखीव क्षेत्र आणि 'पीपल फॉर ॲनिमल्स' संस्थेचे वन्यजीव बचाव केंद्र यांनी सहयोगाने बोर व्याघ्र राखीव क्षेत्रातील विविध गवताळ भागात काळविटांचे वास्तव्य व संख्या याची पाहणी केली. त्यानंतर या भागांमध्ये काळविटांची संख्या वाढवण्याकरता बचाव केंद्रात वन विभागामार्फत आलेल्या काळविटांवर औषधोपचार व आवश्यक आरोग्य तपासणी करून त्यांना या भागांत सोडले. चार मादी काळविटे व एक नर यांच्यासह दोन अजगरांनाही यावेळी नैसर्गिक अधिवासात सोडले.

बोर व्याघ्र राखीव क्षेत्रात काळवीट संवर्धन अभियाना अंतर्गत हा उपक्रम राबवण्यात येत आहे.

**स्रोत** – 'लाघवी कृष्णमृगांवर उपचार आणि केले निसर्गाच्या हवाली', www.loksatta.com, ०४.१०.२०२४.

### बोर व्याघ्र राखीव क्षेत्रात चार नव्या वाघांची नोंद

बोर व्याघ्र राखीव क्षेत्रात वाघांची संख्या चारने वाढली असून आता इथे सुमारे १९ वाघ आहेत. मार्च-एप्रिल महिन्यांत झालेल्या व्याघ्रगणनेत हे निरीक्षण नोंदवले आहे. 'वाइल्डलाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया' (WII) च्या सहकार्याने ही गणना झाली.

बोरच्या ६७४ चौ. किमी गाभा क्षेत्रात आणि १३८ चौ. किमी बफर क्षेत्रात ३९६ स्वयंचलित कॅमेरे बसवून ही गणना करण्यात आली. त्यामध्ये बांगडापर हिंगणी, कवडस, न्यू बोर, ओल्ड बोर या ठिकाणी प्रत्येकी दोन नर व मादी अशा चार वेगळ्या वाघांचा वावर दिसून आला. त्यांना टी-१६, टी-१७, टी-१८ आणि टी-१९ अशी ओळख दिली आहे. गेल्या वर्षी बोर क्षेत्रात नऊ मोठे आणि सहा किशोरवयीन वाघांची नोंद झाली होती. वर्ष २०१४ मध्ये या क्षेत्रात सहा-सात वाघ होते.

बोरच्या गाभ्याचे एकसंघ नियंत्रण अलीकडेच वन्यजीव विभागाकडे देण्यात आले आहे.

**स्रोत** – 'बोर अभयारण्यात वाघांचा संचार वाढला; चार नव्या वाघांची नोंद', www.lokmat.com, ०५.०८.२०२४.

## भीमाशंकर वन्यजीव अभयारण्य

### भीमाशंकर अभयारण्यात १९५ वर्षांनी दिसले रानकुत्रे

भीमाशंकर अभयारण्यात तब्बल १९५ वर्षांनी रानकुत्र्यांची जोडी दिसून आहे.

'अलाइव्ह चॅरिटेबल ट्रस्ट'चे अध्यक्ष व वन्यजीव अभ्यासक उमेश वाघेला यांना अभयारण्यातील आहुपे देवराई परिसरात हे रानकुत्रे दिसले. त्यानंतर १० महिने त्यांचा मागोवा घेत, अभ्यास करून वाघेला यांनी शोधनिबंध लिहिला आहे. वाघेला यांनी या रानकुत्र्यांची छायाचित्रेही घेतली आहेत. 'झूज् प्रिंट' या आंतरराष्ट्रीय विज्ञानपत्रिकेत हा शोधनिबंध प्रकाशित झाला आहे. 'झुलॉजिकल सर्वे ऑफ इंडिया' (ZSI) तून निवृत्त झालेले संशोधक डॉ. अनिल महाबळ यांचे मार्गदर्शन या शोधनिबंधाला लाभले आहे. ZSI मधील सस्तन प्राणी संशोधक डॉ. श्यामकांत तळमळे यांनी वाघेला यांना दिसलेले प्राणी रानकुत्रेच असल्याची खात्री करून दिली आहे.

अभयारण्यातील रानकुत्र्यांच्या अस्तित्वाचा हा पहिला छायाचित्र पुरावा आहे. यापूर्वी भीमाशंकर परिसरात रानकुत्रे असल्याची नोंद १८२८ साली 'ईस्ट इंडिया कंपनी'चे कर्नल हेन्री साईक्स यांनी केली होती. त्यांनी म्हटले होते की भीमाशंकरच्या आदिवासींना रानकुत्र्यांच्या अस्तित्वाची माहिती होती. मृत रानकुत्रे त्यांनी पाहिल्याचे निरीक्षण नोंदवले आहे.

**स्रोत** – श्रीकिशन काळे. 'अखेर भीमाशंकर अभयारण्यात रानकुत्र्यांचे दर्शन; तब्बल १९५ वर्षांनी दिसला हा प्राणी', www.lokmat.com, २७.०८.२०२४.

## संजय गांधी राष्ट्रीय उद्यान

### आरे दुग्ध वसाहतीत आदिवासी बचाव यात्रा


जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधून ९ ऑगस्ट रोजी मुंबईतील आरे दुग्ध वसाहतीत आदिवासी आणि पर्यावरणप्रेमींनी आदिवासी बचाव यात्रा काढली. वन जमीन, मानवाधिकार आणि शेत जमिनीचे प्रश्न सोडवावे, यासह विविध मागण्यांसाठी ही यात्रा होती.

दरवर्षी ९ ऑगस्ट रोजी जागतिक आदिवासी दिवस साजरा करण्यात येतो. यंदा आरे दुग्ध वसाहत, गोरेगाव चेकनाका इथून सकाळी १० वाजता आदिवासी बचाव यात्रेला सुरुवात झाली. आरे वसाहतीतील ५०० हून अधिक आदिवासी या यात्रेत सहभागी झाले होते. मुंबईतील आदिवासी पाडे अधिकृत गावठाण म्हणून घोषित करावे, भारतीय संविधानाने अभिप्रेत असलेली स्वायत्तता आणि

प्रतिनिधित्व आदिवासींना प्रदान करावे, भारतीय संविधानानुसार आदिवासींना मुंबईचे मूळ रहिवासी म्हणून मान्यता द्यावी आणि आतापर्यंत नाकारले जात असलेले प्रमाणपत्र जारी करावे या प्रमुख मागण्या यात्रेकरूंनी मांडल्या.

पोलिसांनी यात्रेपूर्वी दोन दिवस यात्रेला परवानगी नाकारली. मात्र आयोजकांनी निर्णय न बदलता ही आदिवासी बचाव यात्रा काढली. परिणामी या परिसरात मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी झाली होती.

**स्रोत -** 'आरेमध्ये जागतिक आदिवासी दिन साजरा, विविध मागण्यांसाठी आदिवासी बचाव यात्रा', www.loksatta.com, ०९.०८.२०२४.



## सह्याद्री व्याघ्र राखीव क्षेत्र

### सह्याद्री-कोकण भ्रमणमार्ग प्रदेशात ३२ वाघ; पैकी १० वाघ महाराष्ट्रातील

महाराष्ट्र आणि कर्नाटकातील व्याघ्र अधिवासांना जोडणाऱ्या सह्याद्री-कोकण वन्यजीव भ्रमणमार्ग प्रदेशात ३२ वाघांचा वावर असल्याचे आढळले आहे. 'वाइल्डलाईफ कॉन्झर्वेशन ट्रस्ट' (WCT), कोल्हापूर वन विभाग आणि सह्याद्री व्याघ्र राखीव यांच्या सहयोगाने तयार झालेल्या अभ्यास अहवालाचे प्रकाशन 'सह्याद्री व्याघ्र भूप्रदेश संवर्धन परिषदे'त झाले. त्यामध्ये सह्याद्रीत वाघांचे प्रजनन होत असल्याचे महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवले आहे.

या भूप्रदेशातील वाघांच्या संख्येचा अभ्यास WCT ने वन विभागाच्या मदतीने २०२२-२३ या वर्षात केला. त्यामध्ये प्रामुख्याने महाराष्ट्रावर लक्ष केंद्रीत केले होते. गोवा व कर्नाटकातील वाघांची संख्या राष्ट्रीय व्याघ्र गणनेच्या अहवालातून घेतली होती, असे WCT च्या संशोधकांनी सांगितले. कर्नाटकातील १७, गोव्यातील पाच आणि WCT व वन विभागाने छायाचित्रांधारे नोंदवलेले महाराष्ट्रातील १० वाघ मिळून एकूण ३२ वाघ या भ्रमणमार्गात वावरत असल्याचे ते म्हणाले.

महाराष्ट्रातील १० वाघांमध्ये सह्याद्री व्याघ्र राखीव आणि राधानगरी वन्यजीव अभयारण्यातील वाघांच्या संख्येचा समावेश नसल्याचे WCT ने स्पष्ट केले. सह्याद्री-कोकण भ्रमणमार्गात २०१५ साली जन्माला आलेल्या एका वाघिणीने याच भूप्रदेशात तीन बछड्यांना जन्म दिल्याचे दिसून आले आहे. तसेच, वाघ स्थलांतरासाठी या भ्रमणमार्गाचा नियमित वापर करत असल्याचेही आढळले आहे. सह्याद्री व्याघ्र राखीवमधील चांदोली अभयारण्यात मे २०१८ मध्ये आढळलेला टी-३१ हा नर वाघ मे २०२० मध्ये कर्नाटकातील काली व्याघ्र राखीवमध्ये दिसून आला. २०१८ साली महाराष्ट्रात दिसलेली टीटी-७ ही वाघीण ३० जून २०२१ रोजी गोव्यातील म्हादई अभयारण्यात आढळली.

**स्रोत** – 'सह्याद्री-कोकण भ्रमणमार्ग प्रदेशात ३२ वाघांचे अस्तित्व', www.mahamtb.com, ०६.०८.२०२४.

## प्रादेशिक बातम्या

## विदर्भ

### विजेच्या धक्क्याने होणारे वाघांचे मृत्यू रोखण्याबाबत वनमंत्र्यांचे निर्देश

विजेच्या धक्क्याने होणारे वाघांचे मृत्यू रोखण्यासाठी उपाययोजना करण्याचे निर्देश राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी वनाधिकाऱ्यांना दिले आहेत.

गडचिरोली इथे २६ ऑक्टोबर रोजी विजेच्या धक्क्याने एका वाघाचा मृत्यू झाला. त्याची गंभीर दखल घेत

वन मंत्र्यांनी महाराष्ट्र वन विकास महामंडळात तातडीची बैठक घेतली. बैठकीला वरिष्ठ वनाधिकारी उपस्थित होते. विजेच्या धक्क्याने होणाऱ्या वाघांच्या मृत्युंबाबत जनजागृती, कायदेशीर तरतुदी, प्रशिक्षण आदी बाबींवर लक्ष केंद्रीत करावे आणि अशा घटना टाळण्यासाठी सर्वांनी नियोजनपूर्वक प्रयत्न करावेत, असे मुनगंटीवार यांनी बैठकीत सांगितले.

तसेच, गडचिरोली इथल्या घटनेचा तपास करुन तात्काळ कार्यवाहीचे निर्देश मुनगंटीवार यांनी दिले होते. त्यानुसार वन विभागाने जलद गतीने तपासाची सूत्रे हलवून सर्व आरोपींना अटक केल्याचे प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्यजीव) महिप गुप्ता यांनी बैठकीत सांगितले.

**स्रोत** – 'वाघाच्या मृत्यूबाबत काय म्हणाले वनमंत्री..? वनाधिकाऱ्याना दिले "हे" निर्देश', www.loksatta.com, २७.१०.२०२४.



## मुल शहरालगत असलेल्या जंगलात वाघाच्या हल्ल्यात शेळीपालकाचा मृत्यू

चंद्रपूर जिल्ह्यात मुल शहराला लागून असलेल्या जंगलात वाघाच्या हल्ल्यात एका शेळीपालकाचा मृत्यू झाला. ही घटना १९ ऑगस्ट सकाळी उघडकीस आली.

मुल तालुक्यातील चिचाळा गावातील रहिवासी १८ ऑगस्ट रोजी सकाळी २५ शेळ्या चारण्यासाठी मुल शहरालगत असलेल्या जंगलात गेला होता. त्या दिवशी संध्याकाळी २४ शेळ्या घरी परतल्या. मात्र शेळीपालक व त्याची एक शेळी परतली नाही. ही बाब ग्रामस्थांनी वन विभागाला कळवली आणि त्या संध्याकाळी ३० ते ४० ग्रामस्थ शेळीपालकाच्या शोधात जंगलात गेले. मात्र, त्या रात्रीपर्यंत त्याचा शोध लागला नाही. दुसऱ्या दिवशी, १९ तारखेला सकाळी वनाधिकारी, वन विभागाचे पथक आणि ग्रामस्थांनी जंगलात पुन्हा शोध घेतला असता कक्ष क्रमांक ७५२ मध्ये शेळीपालकाचा मृतदेह आढळला.

**स्रोत** – 'जंगलात दबा धरुन बसलेल्या वाघाचा गुराख्यावर हल्ला', www.loksatta.com, १९.०८.२०२४.

## गोंदिया जिल्ह्यातील सारस पक्ष्यांच्या संख्येत घट

गोंदिया जिल्ह्यातील सारस पक्ष्यांची संख्या गेल्या पाच वर्षांत ४५ वरून २८ वर आली आहे.

यंदा २३ ते ३० जून या कालावधीत गोंदिया, भंडारा आणि मध्य प्रदेशातील बालाघाट या जिल्ह्यांमध्ये सारस गणना करण्यात आली. सेवा संस्था, वन व वन्यजीव विभाग आणि स्थानिक शेतकरी, स्वयंसेवकांनी ही गणना केली. त्यामध्ये गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यांमध्ये मिळून ३२ सारस पक्षी आढळले. पैकी चार पक्षी भंडारा जिल्ह्यात व २८ पक्षी गोंदिया जिल्ह्यात दिसले. बालाघाटमध्ये ४५ सारस पक्षी दिसून आले.

गेली पाच वर्षे गोंदिया जिल्ह्यातील सारस पक्ष्यांची संख्या सातत्याने घटत आहे. वर्षनिहाय आकडेवारी पुढीलप्रमाणे –

| वर्ष | सारस संख्या |
|---|---|
| २०२० | ४५ |
| २०२१ | ३९ |
| २०२२ | ३४ |
| २०२३ | ३१ |
| २०२४ | २८ |

**स्रोत** – अंकुश गुंडावार. 'धोक्याची घंटा! पाच वर्षांत घटली सारसांची संख्या, गोंदिया जिल्ह्यात उरले

केवळ २८ सारस', www.lokmat.com, ०१.०७.२०२४.

## पश्चिम महाराष्ट्र

### शेतमजुरांनी शिकार केली तर संबंधित शेतकऱ्यावरही कारवाई करणार - सांगली जिल्ह्यातील सावळज ग्रामपंचायतीचा इशारा

शेतात काम करणाऱ्या परप्रांतीय मजुरांनी वन्य प्राण्याची शिकार केल्याचे आढळल्यास त्या मजुरासह संबंधित शेतकऱ्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील सावळज ग्रामपंचायतीने दिला आहे.

द्राक्ष बागांची फळछाटणी व अन्य कामे साधारणपणे ऑक्टोबरमध्ये सुरू होतात. या कामांसाठी नाशिकसह बिहारमधून मोठ्या प्रमाणात मजूर या भागात दरवर्षी येतात. हे मजूर गावशिवारांत पक्षी, ससे, घोरपडे, मोर आदी वन्य प्राण्याची शिकार करत असल्याचे आढळून आले आहे.  या चोरट्या शिकारीला आळा घालण्यासाठी सावळज ग्रामपंचायतीने पुढाकार घेतला आहे; सरपंचांच्या स्वाक्षरीसह याबाबत ग्रामस्थांना उद्देशून निवेदन जाहीर केले आहे. द्राक्षबागेत कामासाठी वास्तव्यास असलेल्या परप्रांतीय मजुरांनी वन्य प्राण्यांची शिकार करू नये अशी सक्त सूचना मजुरांसह संबंधित मुकादमांना द्यावी. शिकार केल्याचे आढळल्यास संबंधित मजुरासह तो ज्या शेतकऱ्याच्या बागेत काम करत असेल, त्यालासुद्धा जबाबदार धरून कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा ग्रामपंचायतीने दिला आहे.

दरम्यान, अशा प्रकारे ऊस हंगामात साखर कारखान्यांनीही ऊसतोड मजुरांबाबत निर्णय घ्यावा, असे आवाहन मानद वन्यजीव रक्षकांनी केले आहे.

**स्रोत** – 'परप्रांतीय मजुरांच्या शिकारीबद्दल, संबंधित शेतकऱ्यांवरही कारवाई, द्राक्ष बागायतदारांना इशारा', www.loksatta.com, ०३.१०.२०२४.

## कोकण

### ठाणे जिल्ह्यात ९०५ दावेदारांचे वन हक्क मंजूर

ठाणे जिल्ह्यातील आदिवासींना वनपट्ट्यांवर वन हक्क कायद्यानुसार हक्क मंजूर करावे, या मागणीसाठी सप्टेंबरच्या तिसऱ्या आठवड्यापासून श्रमजीवी संघटनेने ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन सुरू केले होते. त्या आंदोलनाची दखल घेत जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी २ ऑक्टोबर रोजी ९०५ वन हक्क दावेदारांना वनपट्ट्यांचे वाटप केले. तसेच उर्वरित दावेदारांच्या कागदपत्रांची पडताळणी सुरु असून त्यांचे दावेही तातडीने मार्गी लावणार असल्याचे जिल्हा प्रशासनाने सांगितले आहे.

काही कागदपत्रांच्या पूर्ततेसाठी ५०१ दावे प्रलंबित ठेवण्यात आले आहेत. त्यांच्या पूर्ततेची पूर्ण संधी दावेदाराला मिळावी, अशा सकारात्मक भूमिकेतून प्रशासन त्या दाव्यांचा लवकरच निपटारा करेल, असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

**स्रोत** – 'ठाणे: ९०५ वन हक्क दावेदारांना वनपट्ट्यांचे वाटप, श्रमजीवी संघटनेच्या आंदोलनाला यश', www.loksatta.com, ०४.१०.२०२४.

### पालघर जिल्ह्यात वन हक्कांना मंजुरी देण्यात तांत्रिक अडचणी; श्रमजीवी संघटनेने केले आंदोलन



पालघर जिल्ह्यात 'श्रमजीवी संघटने'तर्फे दाखल केलेल्या सुमारे ६,२३७ वन हक्क दाव्यांबाबत जिल्हा प्रशासनाने निर्णय घेतला नसल्याचे सांगून संघटनेने आंदोलन सलग आठव्या दिवशी सुरू ठेवले. पालघर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ३ ऑक्टोबर रोजी हे आंदोलन सुरू झाले. संघटनेने दाखल केलेल्या सर्व बाबी निकाली निघेपर्यंत आंदोलन सुरूच राहील असा निर्धार संघटनेने व्यक्त केला.

जिल्हा प्रशासनाने वाडा, वसई व पालघर आणि त्यानंतर डहाणू, जव्हार या उपविभागीय अधिकारी स्तरावरील समितींमार्फत प्रलंबित दाव्यांच्या छाननीला सुरुवात केली आहे. मात्र, आवश्यक पुराव्यांच्या अभावी मंजुरी देणे शक्य होत नाही. तसेच, जिल्हास्तरीय वन हक्क समितीच्या बैठका सातत्याने होत असल्या तरी त्यांना अशासकीय सदस्य गैरहजर राहात असल्याने काही अडचणी उद्भवत आहेत, असे जिल्हा प्रशासनाने सांगितले.

प्रलंबित असणारे बहुतांशी वन दावे नामंजूर करताना जिल्हा प्रशासनाने वर्ष २००५ मधील जीपीएस नोंदणी नाही, दावेदाराची वहिवाट दिसून येत नाही या वन विभागाच्या अभिप्रायाचा आधार घेतला आहे. मात्र, वन हक्क कायदा व त्यामध्ये झालेल्या सुधारणा लक्षात घेता शासनाने या कायद्यात नमूद केलेल्या १४ पुराव्यांपैकी कोणतेही दोन पुरावे ग्राह्य धरून वनपट्टे देणे अपेक्षित आहे. बहुतांशी वन हक्क दाव्यांच्या अर्जांमध्ये आदिवासी असण्याचा पुरावा, वन हक्क समितीची शिफारस, ग्रामसभेची शिफारस, स्थळ पाहणी अहवाल तसेच ज्येष्ठ नागरिकांकडून दिलेली शिफारस असे विविध पुरावे दिले आहेत. तरीदेखील, फक्त वन विभागाचा अभिप्राय ग्राह्य धरून वन हक्क नाकारल्यामुळे आंदोलन छेडल्याचे श्रमजीवी संघटनेने सांगितले. तसेच, जिल्हास्तरीय समितीची बैठक न घेता वन हक्क दावे नाकारल्याकडे संघटनेने लक्ष वेधले आहे. नामंजूर केलेल्या दाव्यांचे जिल्हास्तरावर पुनरावलोकन करावे, त्यासाठी ११ मे २०१८ च्या शासन निर्णयात नमूद केलेल्या आवश्यक पुरावे व शासकीय छाननी सूचीचा आधार घ्यावा, अशा संघटनेच्या मागण्या आहेत.

पालघर जिल्हा प्रशासनाने सुमारे ५०,००० वन हक्क दाव्यांना मंजुरी दिली असून त्यानुसार ३०,००० हेक्टर क्षेत्रफळावर वन पट्टे दिले आहेत. वनपट्ट्याची मागणी करण्यासाठी दावे दाखल करण्याला अंतिम तारीख नाही. त्यामुळे जिल्ह्यात सातत्याने नव्याने दावे दाखल होत आहेत. वर्ष २०२२ पासून सुमारे ५,५०० ते ६,००० दावे जिल्हा प्रशासनाने मार्गी लावले आहेत. तरीही अजून तितकेच दावे प्रलंबित असल्याचे श्रमजीवी संघटनेने सांगितले. हे दावे निकाली काढून दावेदारांना त्याची प्रमाणपत्रे मिळेपर्यंत आंदोलन सुरु ठेवण्याचा निर्णय श्रमजीवी संघटनेने घेतला.

आंदोलनकर्त्यांशी सातत्याने संवाद सुरू असून प्रलंबित ३,००० दाव्यांपैकी ६०० दाव्यांची प्रमाणपत्रे दिल्याचे जिल्हा प्रशासनाने सांगितले. मात्र उर्वरित ठिकाणी, विशेषतः वसई तालुक्यात काही ठिकाणी चाळी उभारल्याचे अथवा राष्ट्रीय महामार्ग लगतच्या भागत हॉटेल उभारल्याचे वर्ष २००५ मध्ये उपग्रहाच्या साहाय्याने घेतलेल्या छायाचित्रांत दिसून आले आहे. अशा ठिकाणी केलेले वन हक्कांचे दावे मंजूर करणे शक्य होत नाही. काही ठिकाणी शेती किंवा लागवड केल्याच्या पुराव्यांऐवजी जंगल दिसून आले आहे. अशा जागांवर वस्तुस्थितीदर्शक पुरावे नसल्यामुळे सुमारे १६०० (दाखल केलेल्याच्या सुमारे २%) दावे नामंजूर केले आहेत. नामंजूर दाव्यांसंदर्भात कोकण आयुक्तांकडे अर्ज केल्यास स्थळाची पाहणी करून, प्रकरण तपासून दाव्याचा फेरविचार करण्याची तरतूद आहे. मात्र, या प्रक्रियेला वेळ लागतो असे जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले.

आंदोलनाच्या दहाव्या दिवशी ६१० वन पट्टे आणि ४,१४६ दाव्यांची तपासणी पूर्ण करून अंतिम मान्यतेसाठी जिल्हास्तरीय वन समितीकडे सादर करण्यात आले. त्यानंतर आंदोलनाची सांगता झाली.

**स्रोत** – 'वन हक्क दावे पूर्ण झाल्याचे आंदोलन मागे न घेण्याचा श्रमजीवी ची भूमिका; श्रमजीवीच्या आंदोलन आठव्या दिवशी सुरू', www.loksatta.com, १०.१०.२०२४.

'श्रमजीवी सत्याग्रहातील कोंडी फुटेना; सुमारे आठ हजार नागरिकांचा सहाव्या दिवशी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या', www.loksatta.com, ०८.१०.२०२४.

''श्रमजीवी संघटने'च्या आंदोलनाला अखेर यश; ५ हजारांपेक्षा जास्त वनदाव्यांचा निपटारा १० दिवसांत', www.etvbharat.com, १३.१०.२०२४.

## मुंबईसह ठाणे व रायगड जिल्ह्यांत कांदळवनावर लक्ष ठेवण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे



ठाणे, मुंबई आणि रायगड जिल्ह्यातील १९५ अतिसंवेदनशील क्षेत्रातील कांदळवनात ६६९ सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्यानुसार कांदळवन क्षेत्र मुंबई विभागाने कार्यवाही सुरू केली आहे. या कामासाठी ११९ कोटी ८८ लाखाचा निधी मंजूर करण्यात आला आहे. हे सीसीटीव्ही सौर उर्जेवर चालवले जाणार आहेत.

मुंबईतील कांदळवन कक्ष आणि रायगड, ठाणे व मुंबईतील प्रादेशिक वन विभागाने संयुक्त सर्वेक्षण करून ठाणे, मुंबई आणि रायगड जिल्ह्यातील अतिसंवेदनशील कांदळवन क्षेत्रे निश्चित केली आहेत. अतिसंवेदनशील कांदळवन क्षेत्रामध्ये मुंबईतील काही भाग, नवी मुंबई, उरण, पनवेल, भिवंडी, ठाणे, कल्याण-डोंबिवली, मुंब्रा, मिरा-भाईंदर, वसई-विरार भागांचा समावेश आहे. ज्या कांदळवन विभागात नागरीकरण, औद्योगिकीकरण अधिक प्रमाणात होत आहे, ते भाग अतिसंवेदनशील म्हणून निश्चित करण्यात आले आहेत.

खारफुटीची जंगले नष्ट करून तिथे होणारा बेकायदा वाळू उपसा, किंवा भराव टाकून बेकायदा होणारी बांधकामे याला आळा घालण्यास कॅमेरे लावल्यामुळे मदत होईल, असे शासनाला अपेक्षित आहे.

**स्रोत** – भगवान मंडलिक. 'ठाणे, मुंबई, रायगड जिल्ह्यातील अतिसंवेदनशील कांदळवन क्षेत्रांवर ६६९ सीसीटीव्हींची नजर', www.loksatta.com, १२.१०.२०२४.

माणूस-बिबट्या

## संगमनेर तालुक्यात तीन महिन्यांत बिबट्यांच्या हल्ल्यांत तीन व्यक्ती ठार

अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यात ११ ऑक्टोबरच्या संध्याकाळी देवगाव इथे बिबट्याच्या हल्ल्यात महिलेचा मृत्यू झाला. जुलै, ऑगस्टपासून देवगावसह हिवरगाव पावसा, निमगाव टेंभी, वाघापूर, खराडी या परिसरात बिबट्याच्या हल्ल्यांत किमान तीन व्यक्तींचा मृत्यू झाला.

बिबट्यांच्या हल्ल्यांमुळे परिसरातील लोक दहशतीखाली आहेत. पहाटे आणि संध्याकाळच्या वेळेस चालणारा दुधाचा धंदा, तसेच शेतीच्या दैनंदिन कामकाजावर परिणाम झाल्याने लोक त्रासलेले आहेत. वन विभागाच्या अधिकाऱ्यांना फोन करून लोक तक्रारी सांगतात, परंतु वन विभागाचे अधिकारी नागरिकांचे फोन घेत नाहीत. जिथून तक्रार येते त्या परिसरात पिंजरा लावून वन कर्मचारी गायब होतात, अशा लोकांच्या तक्रारी असल्याचे वृत्तात म्हटले आहे.

परिणामी ११ ऑक्टोबरला बिबट्याच्या हल्ल्यात महिला ठार झाल्यावर संतापलेल्या ग्रामस्थांचा जवळपास चारपाच हजारांचा जमाव १२ ऑक्टोबर रोजी वन विभागाच्या निषेधार्थ रस्त्यावर उतरला. नागरिकांनी 'रास्ता रोको' आंदोलन केले.

आंदोलनाची माहिती मिळताच त्यावेळी संगमनेर तालुक्यातच असलेले आमदार बाळासाहेब थोरात यांनी आंदोलन स्थळी भेट दिली. लोकांच्या तीव्र भावना ऐकून घेतल्यानंतर त्यांनी राज्याचे वन मंत्री सुधीर मुनगंटीवार यांना फोन केला. या समस्येवर तातडीने उपाययोजना करण्याचे आदेश वन विभागाला देत असल्याचे मुनगंटीवार यांनी सांगितले. त्यानंतरही लोकभावना तीव्र होत्या. अखेर, थोरात यांनी समजूत काढल्यानंतर लोकांनी आंदोलन थांबवले.

**स्रोत** – 'थोरात यांचा थेट वनमंत्र्यांना फोन… वन मंत्र्यांनी दिले बिबट्याला गोळ्या घालण्याचे आदेश! नेमके

काय घडले?' www.loksatta.com, १२.१०.२०२४.

### गिरडा वन वर्तुळात बिबट्याच्या हल्ल्यात शेतकऱ्याचा मृत्यू; सप्टेंबर महिन्यात दहा दिवसांत पाच बिबटे जेरबंद

बुलढाणा तालुक्यात गिरडा वन वर्तुळात २९ ऑगस्ट रोजी दुपारी साडेतीन वाजता बिबट्याच्या हल्ल्यात एका युवा शेतकऱ्याचा मृत्यू झाला. गेल्या काही महिन्यांत गिरडा वन वर्तुळात बिबट्यांच्या हल्ल्यांमध्ये वाढ झाल्याचे निरीक्षण वन विभाग आणि ग्रामस्थांनी नोंदवले आहे.

त्यामुळे वन विभागाने गिरडा गावाजवळ दोन पिंजरे लावले आणि वन कर्मचाऱ्यांची तीन पथके स्थापन केली. ग्रामस्थांमध्ये जागरूकता निर्माण करण्याची मोहीम राबवली आणि गस्तही वाढवली.

वन विभागाने लावलेल्या पिंजऱ्यात १२ सप्टेंबर रोजी बिबट्याची मादी अडकली. तिची नागपूर इथल्या गोरेवाडा प्राणिसंग्रहालयात रवानगी करण्यात आली आहे. त्यानंतर २२ सप्टेंबर पर्यंत बुलढाणा वन विभागाने गिरडा परिसरातून एकूण पाच बिबट्यांना जेरबंद केले आहे. यापैकी तीन बिबटे मेळघाट व्याघ्र राखीव क्षेत्राचा भाग असलेल्या अंबाबरवा वन्यजीव अभयारण्यात सोडण्यात आले; तर दोन बिबट्यांना गोरेवाडा प्राणिसंग्रहालयात पाठवले.


**स्रोत** - 'मानव-वन्यजीव संघर्ष; तब्बल पाच बिबट जेरबंद', www.loksatta.com, २२.०९.२०२४.

### चंद्रपूर जिल्ह्यातील दुर्गापुरात सात वर्षीय मुलाला बिबट्याने उचलून नेले

चंद्रपूर जिल्ह्यातील दुर्गापूर परिसरात सिनाळा इथे सात वर्षांच्या मुलाला बिबट्याने उचलून नेल्याची घटना २० सप्टेंबर रोजी घडली. दुसऱ्या दिवशी मुलाचा मृतदेह झुडुपांमध्ये आढळला. राज्याचे वन मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी घटनेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी तात्काळ उपाययोजना करण्याच्या सूचना वन विभागाला केल्या आहेत.

घटनास्थळाच्या काही अंतर अलीकडे वन्य प्राण्यांना अडवण्यासाठी यापूर्वीच दीड किलोमीटर लांबीची जाळी लावण्यात आली आहे. मात्र, जाळीच्या पुढे काही अंतरावर ही घटना घडली. त्यामुळे आता त्याच जाळीला जोडून पुढे पुन्हा एक ते दीड किलोमीटरची जाळी लावण्यात येणार आहे. तसेच, ज्या भागात वन्य प्राण्यांचा वावर अधिक असण्याची शक्यता आहे, अशा चार वेगवेगळ्या ठिकाणी पिंजरे लावले आहेत. याशिवाय प्राथमिक प्रतिसाद दल आणि शीघ्र प्रतिसाद दलाची गस्त पूर्ण वेळ सुरू आहे.

**स्रोत** – 'वन्य प्राण्यांच्या वाढत्या हल्ल्यांवर वनमंत्री म्हणतात, "उपाययोजना…"', www.loksatta.com, २३.०९.२०२४.



### बिबट्यापासून स्वसंरक्षणासाठी जुन्नर तालुक्यातील शेतकऱ्यांची कर्ज काढून उपाययोजना; आठ महिन्यांत बिबट्यांच्या हल्ल्यांत पाच मृत्यू

पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात माणूस-बिबट्या संघर्षाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून स्वसंरक्षणासाठी स्थानिक शेतकऱ्यांनी स्वतःच उपाय केला आहे. ही उपाययोजना खर्चिक असून सर्वच शेतकऱ्यांना परवडणारी नाही, त्यामुळे शासनाने अनुदान दिल्यास ते शक्य होईल, असे स्थानिकांनी म्हटले आहे.

शेतावर वस्ती करून राहणाऱ्या काही शेतकऱ्यांनी घराभोवती सुमारे १० फूट उंचीची लोखंडी जाळी लावून घेतली आहे. त्यासाठी त्यांना प्रत्येकी दीडदोन लाख रुपयांचा खर्च करावा लागला आहे.

गेल्या आठ महिन्यांत तालुक्यातील आळे, पिंपरी पेंढार, पिंपळवंडी, शिरोली खुर्द, तेजवाडी इथे बिबट्यांच्या हल्ल्यांत पाच व्यक्तींचा मृत्यू झाला. त्यात दोन लहान मुले असून त्यांना घराच्या अंगणातून बिबट्याने उचलून नेले. नारायणगाव वनपरिक्षेत्रातील नारायणगाव, वारुळवाडी, नारायणवाडी, मांजरवाडी, वळणवाडी, आर्वी, येडगाव, शिरोली, तेजवाडी या बागायती क्षेत्रात बारमाही पिके असून इथे बिबट्यांची संख्या वाढल्याचे वृत्तात नमूद केले आहे.

उघड्यावर झोपलेले, शेतात शौचास गेलेले, अंगणात बसलेले, शेतात वाकून काम करणारे अशा लोकांवर बिबट्यांचे हल्ले झाल्याचे निरीक्षण जाणकारांनी नोंदवले आहे. तालुक्यात ऊस शेती आणि बागायती मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे बहुतेक शेतकरी शेतावर घर करून राहतात. तालुक्यातील काही शेतकऱ्यांनी दोन लाख रुपये कर्ज काढून घराभोवती जाळी लावून घेतली आहे. अशी जाळी लावून घेण्यासाठी शासनाने अनुदान दिले तर सर्व शेतकऱ्यांना हा उपाय करता येईल, असे मत स्थानिक शेतकऱ्यांनी व्यक्त केले आहे.

वन विभाग बिबट्यांना जेरबंद करून अन्यत्र सोडणे, जीवितहानी, पशुधनहानीसाठी नुकसान भरपाईदाखल आर्थिक मोबदला देणे, जनजागृती अशा उपाययोजना करतो. मात्र, बिबट्यांच्या वाढलेली संख्या पाहता त्या पुरेशा ठरत नसून त्यामुळे वन विभागाचे अधिकारी, कर्मचारीही हतबल ठरत आहेत.

(संबंधित वृत्त पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र* खंड ५ अंक ३)

**स्रोत** – 'बिबट्याच्या बचावासाठी शेतकऱ्याची नवी संकल्पना, जुन्नरमध्ये मानव बिबट संघर्ष दिवसेंदिवस अधिक तीव्र', www.esakal.com, २८.०९.२०२४.


## **जुन्नर वन विभागात सुमारे ५०० बिबटे – वन विभागाची माहिती**

पुणे जिल्ह्यातील जुन्नर वन विभागांतर्गत आंबेगाव, जुन्नर, शिरूर खेड या चार तालुक्यांमध्ये जवळपास ५०० बिबट्यांचा संचार असल्याच्या माहितीला वन विभागाने दुजोरा दिला आहे. जुन्नर तालुक्यातील ओतूर आणि आंबेगाव तालुक्यातील मंचर या दोन विभागांमध्ये बिबट्यांची संख्या जास्त असून दिवसाढवळ्या बिबटे दिसत आहेत, असे वृत्तात म्हटले आहे.

जुन्नर वन विभागातील चार तालुक्यांमधून जेरबंद केलेल्या बिबट्यांना – त्यांनी माणसावर हल्ला केलेला असेल तर माणिकडोह इथल्या बिबट्या निवारा केंद्रात ठेवले जाते. मात्र, या केंद्राची क्षमताही ४० ते ४५ बिबट्यांपुरती मर्यादित आहे. परिणामी, जवळपास रोज जेरबंद केलेले बिबटे पुन्हा वन क्षेत्रात, अभयारण्यात सोडले जातात. हे बिबटे अन्नपाण्याच्या शोधात पुन्हा ऊसशेतीत येतात.

माणिकडोह केंद्राची क्षमता १५० बिबट्यांना सामावून घेण्याइतकी वाढवावी, असा वन विभागाचा प्रस्ताव आहे. त्याचबरोबर, बिबट्यांच्या संख्येवर नियंत्रण आणण्यासाठी त्यांची नसबंदी करण्याचा उपाय करण्याचे वृत्तात सुचवले आहे.

**स्रोत** – नवनाथ भेके. 'जुन्नर वन विभागात फिरताहेत ५०० बिबटे; वन विभागानेच दिला दुजोरा', www.esakal.com, २२.०८.२०२४.



# माणूस-बिबट्या संक्षिप्त वृत्त

| जिल्हा | तालुका/शहर | घटना | स्रोत |
|---|---|---|---|
| अहमदनगर | संगमनेर | संगमनेर शहराजवळ घुलेवाडी परिसरात बिबट्याच्या हल्ल्यात दुचाकीस्वाराला गंभीर दुखापत | सकाळ १८.१०.२०२४ |
| | | हिवरगाव पावसा गावात दोन महिन्यांत बिबट्यांचे दोन हल्ले; पहिल्या हल्ल्यात दीड वर्षांच्या मुलीचा तर दुसऱ्या हल्ल्यात एका महिलेचा मृत्यू | सकाळ १२.०९.२०२४ |
| जळगाव | चाळीसगाव | गणेशपूर शिवारात बिबट्याच्या हल्ल्यात १३ वर्षीय मुलाचा मृत्यू | सकाळ १६.०९.२०२४ |
| नागपूर | पारशिवनी | कन्हान शहरालगत निलज गावात बिबट्याच्या हल्ल्यात गाय ठार | सकाळ १०.१०.२०२४ |
| | सावनेर | नंदापूर, कोंदेगाव परिसरात बिबट्याने केली शेतकऱ्यांच्या पाळीव जनावरांची शिकार | सकाळ १९.०९.२०२४ |
| नाशिक | नाशिक शहर | माने नगर इथे के. के. वाघ कृषी महाविद्यालयाजवळ बिबट्याच्या हल्ल्यात शेळी ठार | सकाळ १४.१०२०२४ |
| | सिन्नर | जोगलटेंभी इथे शेतकरी संगीता काळे बिबट्याच्या हल्ल्यात जखमी, जोरदार प्रतिकार केल्यामुळे बिबट्याची माघार; संगीता यांच्यावर गेल्या वर्षीही ऑगस्ट महिन्यात झाला होता बिबट्याचा हल्ला | महाराष्ट्र टाइम्स २०.०८.२०२४ |
| नंदुरबार | तळोदा | काजीपूर इथे १७ सप्टेंबर रोजी बिबट्या जेरबंद; महिन्याभरात जेरबंद केलेला हा चौथा बिबट्या | सकाळ १९.०९.२०२४ |
| पुणे | आंबेगाव | पिंपळगाव-खडकी ग्रामपंचायतीच्या हद्दीत दोन बिबट्यांच्या झुंजीत दीड वर्षांच्या मादीचा मृत्यू | सकाळ १३.१०२०२४ |
| | जुन्नर | पिंपरी पेंढार इथे डेरे मळा शिवारात वन विभागाने लावलेल्या पिंजऱ्यात बिबट्या जेरबंद; तत्पूर्वी दोन दिवस परिसरात बिबट्याच्या हल्ल्यात महिलेचा मृत्यू | सकाळ ११.१०.२०२४<br>लोकमत ०९.१०.२०२४ |
| | | ओतुर हद्दीत हांडेबन वाघदरातील कुडाचे माळ परिसरात मेंढपाळाच्या वाड्यातील पालात शिरून बिबट्याचा महिलेवर हल्ला; महिला जखमी | लोकमत ०७.१०.२०२४ |
| | | तेजेवाडी इथे बिबट्याच्या हल्ल्यात आठ वर्षीय मुलाचा मृत्यू | लोकमत २५.०९.२०२४ |
| बीड | आष्टी | लिंबोडी शिवारात बिबट्याचे वास्तव्य; किमान तीनचार शेळ्यांचा पाडला फडशा | लोकमत २३.०९.२०२४ |
| रत्नागिरी | संगमेश्वर | देवरूख-मार्लेश्वर मार्गावर कांजिवरा इथे वाहनाच्या धडकेत बिबट्या ठार; या अपघाताच्या दोनच दिवसांपूर्वी देवरूखजवळ कर्ली इथे आढळला मृत बिबट्या | लोकमत २३.१०.२०२४ |

## राज्यस्तरीय बातम्या

### राज्यातील ७० वनपरिक्षेत्रांमध्ये मुख्य अधिकाऱ्यांच्या जागा रिक्त



राज्यातील ७० वनपरिक्षेत्रांमध्ये वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांच्या जागा रिक्त आहेत. त्यामुळे या वनपरिक्षेत्रांमधील वने आणि वन्यजीवांची सुरक्षितता धोक्यात असल्याचे वृत्त आहे.

राज्य निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी वन विभागासह इतर सर्व शासकीय विभागांतील पात्र अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्याचे निर्देश दिले होते.

राज्यातील वन विभागातील ७० वनपरिक्षेत्रांसाठी आवश्यक कागदपत्रांसह सुमारे ४०० वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांकडून विनंती बदलीसाठी अर्ज मंत्रालयात आले आहेत; तर प्रादेशिक अंतर्गत बदलीसाठी ३५ अर्ज आले आहेत. त्यावर कोणतीही कार्यवाही झालेली नाही. तसेच, हव्या त्या ठिकाणी बदली मिळवण्यासाठी १२ ते १५ लाख रुपयांचे गैरव्यवहार झाल्याचेही वृत्तात नमूद केले आहे.

**स्रोत** – गणेश वासनिक. 'वन विभागात प्रादेशिकमध्ये ७० रेंज अधिकाऱ्यांविनाच; वने, वन्यजीव वाऱ्यावर', www.lokmat.com, ०४.१०.२०२४.

## राष्ट्रीय बातम्या

### व्याघ्र राखीव क्षेत्रातील आदिवासींच्या पुनर्वसनाला गती देण्याच्या निर्णयाला देशभरातून विरोध

आदिवासी समुदायांचे व्याघ्र राखीव क्षेत्रांमधून इतरत्र पुनर्वसन करण्याच्या राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण – NTCA च्या निर्देशाला देशभरातून विरोध होत आहे. या निर्देशामुळे NTCA च्याच आकडेवारीनुसार ६४,००० हून अधिक आदिवासी व इतर वनाधारित पारंपरिक कुटुंबांना त्यांच्या पारंपरिक वसतिस्थानाबाहेर काढावे लागणार आहे.

NTCA च्या आकडेवारीनुसार, १९७२ साली व्याघ्र प्रकल्पाची घोषणा झाल्यापासून ते २०२४ पर्यंत देशातील ५३ व्याघ्र राखीव क्षेत्रांमधून २५७ गावांमधील २५,००७ कुटुंबांना बाहेर काढण्यात आले आहे. आजघडीला ५९१ गावांमधील ६४,८०१ कुटुंबे व्याघ्र राखीव गाभा क्षेत्रात वसलेली आहेत, असे ही आकडेवारी सांगते. या सर्व कुटुंबांना व्याघ्र राखीव क्षेत्रांच्या बाहेर काढण्याच्या प्रक्रियेला गती देण्यास सांगणारे पत्र NTCA च्या संचालकांनी राज्यांच्या वन्यजीव अधिकाऱ्यांना पाठवल्याचे माहितीच्या अधिकारात मागवलेल्या माहितीत जुलै महिन्यात उघड झाले.

मात्र, ही प्रक्रिया वन हक्क कायदा २००६ सारख्या राष्ट्रीय कायद्यासह संयुक्त राष्ट्रांच्या स्थानिक लोकसमूहांच्या अधिकाराच्या जाहीरनाम्यासारख्या आंतरराष्ट्रीय तरतुदींचेही उल्लंघन करणारी असल्याचे टीकाकारांनी म्हटले आहे (पुढील वृत्त पाहा). या निर्णयामागे आर्थिक हितसंबंध गुंतलेले असून स्थानिक लोकसमूहांना बाहेर काढल्यावर देशातील पर्यटन क्षेत्राच्या वाढीत भर घालण्यासाठी व्याघ्र पर्यटन स्थळांमध्ये भर पडेल, याकडे त्यांनी लक्ष वेधले आहे.

'सर्वायवल इंटरनॅशनल' या आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संस्थेने NTCA च्या पत्राला विरोध दर्शवणारे प्रसिद्धीपत्रक जारी केले आहे. त्यात म्हटले आहे, "भारतीय प्रशासन कालबाह्य झालेले वसाहतकालीन निकषांनुसार संवर्धन करू पाहात आहे. मात्र ती विचारधारा स्थानिक लोकांमुळे वन्यजीवांना धोका पोहोचतो अशा चुकीच्या दृष्टीकोनातून पाहते. वास्तविक, या लोकसमूहांची परिसंस्था राखण्यात महत्त्वाची भूमिका असते."

मात्र, व्याघ्र संवर्धनाला पाठिंबा दर्शवणाऱ्या संस्था, संघटना या मुद्द्यावर मूग गिळून आहेत. व्याघ्र

संवर्धनासाठी स्थानिक लोकसमूहांचे विस्थापन गरजेचे असल्याचे त्या मानतात, असे वृत्तात नमूद केले आहे.

**स्रोत** – शिमाली चौहान. ‘Forced evictions in India’s tiger reserves spark outcry among Adivasi communities’, www.downtoearth.org.in, २२.०९.२०२४.



**व्याघ्र प्रकल्पातील लोकांच्या स्थलांतराबाबत NTCA ची भूमिका बेकायदा - जाणकारांचे मत**

राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण (NTCA) ने १९ जून रोजी राज्यांना पत्र पाठवून व्याघ्र प्रकल्पातील लोकांच्या स्थलांतराचा कालनिर्धारित नियोजन आराखडा मागितला आहे. मानवाधिकार कार्यकर्ते, जाणकार व्यक्ती यांचा समावेश असलेल्या सुमारे १५० गटांनी NTCAचे हे निर्देश मागे घेण्याची मागणी करणारे पत्र ५ सप्टेंबर रोजी केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांना पाठवले आहे. पत्राची प्रत व्याघ्र प्रकल्प प्रमुख व NTCA चे सदस्य सचिव गोविंद सागर भारद्वाज यांना पाठवल्याचे वृत्तात नमूद केले आहे.

केंद्रीय मंत्र्यांना पाठवलेल्या पत्रात निर्णयाला विरोध करणाऱ्या गटांनी विरोधामागील कारणे स्पष्ट केली आहेत. स्थानिक व देशी समुदायांचे हक्क आणि भूमिका संवर्धनाच्या शाश्वततेसाठी आवश्यक ठरते. ही बाब ओळखून देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय कायद्यांमध्ये सामावून घेतली आहे. NTCA चे स्थलांतराचे निर्देश राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अशा दोन्ही स्तरांवरील कायद्यांचे उल्लंघन करणारे आहेत. NTCA ने उचललेले पाऊल हे वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ (२००६) (WLPA), वन हक्क कायदा २००६, जमीन संपादन, पुनर्वसन आणि पुनर्वसाहत कायदा २०१३ मध्ये अपेक्षित न्याय्य मोबदला व पारदर्शकता, अनुसूचीत जाती आणि अनुसूचीत जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा १९८९ यांचे उल्लंघन करणारे व पर्यायाने संवर्धनाच्या मूळ उद्देशाशी फारकत घेणारे आहे. खेरीज, WLPA मधील कलम ३८ (ओ) हे स्थानिक लोक विशेषतः अनुसूचीत जमातींच्या अधिकारांना अडथळे निर्माण होतील अशा प्रकारचे निर्देश NTCA ने देण्याला प्रतिबंध करते. हे लक्षात घेऊन व्याघ्र प्रकल्पातील लोकांच्या स्थलांतर व पुनर्वसन प्रक्रिया कायदेशीर होत आहे याची पाहणी करून अहवाल देण्यासाठी स्वतंत्र समितीची नेमणूक करावी आणि राज्यांना NTCA ने त्यानुसार नवे निर्देश जारी करावेत, अशा मागण्या गटांनी केल्या आहेत.

देशातील व्याघ्र अधिवास असलेल्या १९ राज्यांना NTCA ने १९ जून २०२४ रोजी पाठवलेल्या पत्रात म्हटले आहे की व्याघ्र प्रकल्पाला १९७२ मध्ये सुरुवात झाली तेव्हापासून देशातील ५३ व्याघ्र राखीव क्षेत्रांच्या गाभा क्षेत्रातील ८४८ गावांमध्ये वसलेल्या ८९,८०८ कुटुंबांपैकी २५७ गावांमधील २५,००७ कुटुंबांना राखीव क्षेत्रांतून बाहेर स्थलांतरित केले आहे. आता गाभा क्षेत्रात ५९१ गावांमध्ये ६४,८०१ कुटुंबे राहतात. या सर्वांचे स्थलांतर व पुनर्वसन प्राधान्याने आणि वेगाने करावे, त्यासाठी कालनिर्धारित आराखडा तयार करावा, असे निर्देश NTCA ने दिले आहेत.

कार्यकर्त्यांच्या गटांनी त्यांच्या पत्रात पुढे म्हटले आहे की वन्यजीवांसाठी अबाधित क्षेत्र राखताना त्यामुळे अनुसूचीत जमाती आणि वनाधारित पारंपरिक जीवनशैली जगणाऱ्या इतर रहिवाशांच्या हक्कांवर त्याचा परिणाम होणार नाही हे लक्षात घेणे कायद्याने बंधनकारक आहे. अबाधित क्षेत्र निर्माण करताना या लोकसमूहांचे स्थलांतर स्वेच्छेने आणि प्रशासन व लोक या दोहोंना मान्य असतील अशा अटीशर्तींना धरून होणे गरजेचे आहे. NTCA आजही

आर्थिक मोबदला म्हणून विस्थापितांना १५ लाख रुपये देते. केंद्राकडून दिली जाणारी ही रक्कम पुनर्वसन कायदा २०१३ अनुसार पुरेशी नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. त्याचबरोबर, अशा प्रकारे अंमलबजावणी केल्यास अनुसूचीत जमाती व इतर वनाधारित पारंपरिक लोकसमूह आणि राज्य प्रशासनात संघर्ष उद्भवेल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

**स्रोत** – जयश्री नंदी. 'Experts raise concern as NTCA calls for relocation of villages', www.hindustantimes.com, ०८.०९.२०२४.

हिमांशु नितनवरे. 'Conservationists demand NTCA to withdraw relocation of forest-dwelling communities from tiger reserves', www.downtoearth.org.in, ०६.०९.२०२४.

निखिल घाणेकर. 'Roll back advisory on village relocation from tiger reserves, rights groups tell Centre', www.indianexpress.com, ०६.०९.२०२४.

(टीप – वरील दोन्ही वृत्तांतील आकडेवारीत तफावत आढळल्याने या संदर्भातील बातम्यांव्यतिरिक्त अन्य स्रोतांचा आधार घेऊन आकडेवारीतील तफावत दूर केली आहे. संदर्भासाठी वापरलेले स्रोत –

१. https://kalpavriksh.org/wp-content/uploads/2024/09/Statement-Final.pdf?srsltid=AfmBOoqARNeQQh_eh1vODKW5KMe6PAD-EbvQshnLA1QxOOSuSY_2aLLw

२. https://pucl.org/manage-press-stateme/statement-on-ntcas-19th-june-order-to-expedite-evictions-in-the-name-of-tiger-conservation-cnapa/



**लोकसभा निवडणुकीनंतर राष्ट्रीय वन्यजीव मंडळाच्या पहिल्याच बैठकीत संरक्षित क्षेत्रांतील अनेक प्रकल्पांना मंजुरी**

लोकसभा निवडणुकीनंतर राष्ट्रीय वन्यजीव मंडळाच्या स्थायी समिती (SC-NBWL) ची पहिली बैठक जुलै अखेरीस पार पडली. या आधीच्या बैठकीला पाच महिने उलटून गेल्यावर झालेल्या या बैठकीत देशातील वन्यजीव अभयारण्ये, राष्ट्रीय उद्यानांसह व्याघ्र भ्रमणमार्गातील अनेक प्रकल्पांना समितीने मंजुरी दिली आहे. त्यामध्ये गुजरातेतील कच्छच्या लहान वाळवंटातील आणि गोव्यातील मोले राष्ट्रीय उद्यानातील वीजवाहिन्यांचे प्रकल्प, तसेच मध्य भारतातील व्याघ्र अधिवासात पायाभूत सुविधा प्रकल्पांचा समावेश आहे.

SC-NBWL च्या बैठकीत १२ राज्यांमधील १२१ प्रकल्पांबाबत चर्चा झाली. मोले राष्ट्रीय उद्यान आणि भगवान महावीर वन्यजीव अभयारण्यात प्रस्तावित प्रकल्पांमुळे कराव्या लागणार असलेल्या जंगलतोडीला तीव्र विरोध होत असूनही समितीने २७ हेक्टर जंगल क्षेत्रावर ४०० किलोवोल्टच्या वीजवाहिन्या उभारण्यास सशर्त मंजुरी दिली आहे. कर्नाटकातील जंगल क्षेत्रावर असलेल्या प्रकल्पाच्या भागाला समितीची मंजुरी मिळेपर्यंत या प्रकल्पाच्या उभारणीला सुरुवात करू नये आणि वीजवाहक तारांसाठी उभारल्या जाणाऱ्या मनोऱ्यांच्या संपर्कात वन्य प्राणी येणार नाहीत, यासाठी उपाययोजना करावी, या अटी समितीने घातल्या आहेत. तसेच, वीजवाहिन्यांचा जैवविविधता, वन्यजीवांवरील संभाव्य परिणामांचा अभ्यास करून अधिवासाला धक्का पोहोचणार नाही अशी खबरदारी प्रकल्प विकासकांनी घ्यावी, असे समितीने सांगितले आहे.

गोव्यातील नागरिकांनी 'मोले बचाव'ची हाक देत संरक्षित क्षेत्रांमधून प्रस्तावित वीजवाहिन्या आणि रेल्वेमार्गाच्या दुपदरीकरणाला विरोध दर्शवला आहे. तरीदेखील, सह्याद्रीतील घनदाट जंगलातील ७,८८१ झाडे तोडावी लागतील अशा वीजवाहिन्यांच्या प्रकल्पाला समितीने मंजुरी दिली आहे. या प्रकरणी एप्रिल २०२२ मध्ये

सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिले होते की नवी वीजवाहिनी सध्या असलेल्या ११० किलोवोल्टच्या वाहिनीच्या मार्गातूनच न्यावी, जेणेकरून जंगलतोड कमी करावी लागेल. गुजरातमध्ये वीजवाहिन्यांच्या दोन प्रकल्पांनाही बैठकीत मंजुरी मिळाली. पैकी एक कच्छच्या मोठ्या वाळवंटातील अभयारण्यात आहे, तर दुसरा कच्छच्या लहान वाळवंटात जंगली गाढवांसाठी राखीव अभयारण्यात आहे. या प्रकल्पाचे काम वन्यजीवांवरील परिणामांची तीव्रता कमी करण्यासाठी वाइल्डलाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया (WII) ने दिलेल्या उपाययोजनांच्या अंमलबजावणीसह करण्यास NBWL ने सांगितले आहे.

सातपुडा आणि मेळघाट या व्याघ्र राखीव क्षेत्रांदरम्यान असलेल्या वन्य अधिवासातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग ४६ च्या इटारसी ते बेतुल टप्प्याला SC-NBWL च्या बैठकीत मंजुरी मिळाली. या प्रकल्पाकरता १०१ हेक्टर वन जमीन वापरली जाणार असून महामार्गावर वन्य प्राण्यांसाठी बोगदे आणि पूल उभारण्याची अट समितीने घातली आहे. तसेच, या उपाययोजनांच्या उभारणीच्या स्थळांची पाहणी राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण (NTCA), WII यांनी करावी, तसेच पर्यावरण मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी त्यांच्या उभारणीसाठी बनवलेले आराखडे तपासून घ्यावेत, असेही सांगितले आहे.

**स्रोत** – निखिल घाणेकर. ‘In first post-election meeting, wildlife board clears transmission lines in Gujarat’s flamingo habitat, Goa’s Mollem forest’, www.indianexpress.com, १०.०९.२०२४.

## आंतरराष्ट्रीय बातम्या

### गेल्या ५० वर्षांत विविध परिसंस्थांमधील वन्यजीवांच्या संख्येत सरासरी ७३% घट

गेल्या ५० वर्षांत, १९७० ते २०२० या काळात जगातील विविध परिसंस्थांमधील वन्यजीवांच्या संख्येत सरासरी ७३% घट झाली आहे. सर्वाधिक घट ही गोड्या पाण्यातील परिसंस्थेतील वन्यजीवांच्या संख्येत झाली असून त्यापाठोपाठ जमिनीवरील आणि सागरी परिसंस्थेतील जीवांमध्ये घट झाली आहे. ‘वर्ल्डवाईड फंड फॉर नेचर’ (WWF) च्या ‘लिविंग प्लॅनेट रीपोर्ट २०२४’ या अहवालात ही निरीक्षणे नोंदवली आहेत.

गोड्या पाण्यातील परिसंस्थांमधील जीवांमध्ये ८५% घट झाल्याचे दिसून आले आहे. जमिनीवरील परिसंस्थांमधील जीवांमध्ये ६९% आणि सागरी परिसंस्थांमधील जीवांमध्ये ५६% घट नोंदवण्यात आली आहे.

भारतातील गिधाडांच्या तीन प्रजातींच्या संख्येत झालेली घट चिंताजनक असल्याचे मत अहवालात नोंदवले आहे. १९९२ ते २००२ या काळात ही घट वेगाने झाल्याचे निरीक्षण संशोधनात नोंदवले आहे. २०२२ मध्ये २००२ च्या तुलनेत पांढऱ्या पाठीच्या गिधाडांची संख्या ६७ टक्क्यांनी, लांब चोचीच्या गिधाडांची संख्या ४८ टक्क्यांनी आणि बारीक चोचीच्या गिधाडांची संख्या ८९ टक्क्यांनी घटल्याचे ‘बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी’च्या सर्वेक्षणाचा दाखला देऊन नमूद केले आहे.






**स्रोत** – ‘चिंताजनक! गेल्या ५० वर्षांत वन्यजीवांच्या संख्येमध्ये तब्बल ७३ टक्के घट; आशियातील देश आघाडीवर’, www.mahamtb.com, ०६.०८.२०२४.


BOOKS FROM THE *PA UPDATE*


1) *Conservation Kaleidoscope: People, Protected Areas and Wildlife in Contemporary India*, 2021, 450 pp, 140 line drawings., Price: 650
2) *The State of Wildlife and Protected Areas in Maharashtra: News and Information from the Protected Area Update 1996-2015,* 2019. 250 pp, 100 line drawings, Price: Rs. 400
3) *The State of Wildlife in North-East India 1996-2011: A compilation of news from the Protected Area Update,* 2013, 330 pp, 100 line drawings, Price: Rs. 300

**For more details and to order copies, please write to psekhsaria@gmail.com**



**Support the *PA Update***

We continue to need financial support to sustain the publishing of the PA Update. Please considering donating for the same or subscribing for yourself, your institutions or gifting subscriptions. For further details please write to psekhsaria@gmail.com

# थोडक्यात पण महत्त्वाचे

## संवर्धनाचा अर्थ नव्याने समजून घेताना...

आपण लहान असताना आपल्याला नेहमी रेषांच्या मध्ये रंग भरायला, नियमांचे पालन करायला आणि शिस्त पाळायला शिकवले जाते. एकदा मोठे झालो की, आपल्यापैकी बहुतेकांसाठी या रेषांची जागा कायदा घेतो. एक तरुण 'पॉलिसी ऑफिसर' म्हणून कायद्यांचा अभ्यास आणि त्यावर काम करताना मला अनेकदा एक मोठा प्रश्न पडतो, तो म्हणजे – आपण आपल्या रेषा कुठे आखणार आहोत?

भारतातील वन संवर्धन या विषयापुरता या प्रश्नाचा विचार केला आणि त्यासाठी या विषयाचे नियमन करणाऱ्या दोन मुख्य कायद्यांचा आढावा घेतल्यास काय दिसते हे पाहूया. हे दोन कायदे म्हणजे, १९७२चा वन्यजीव संरक्षण कायदा आणि २००६चा वन हक्क कायदा. या दोन्ही कायद्यांचे उद्दीष्ट वनसंवर्धन असले तरी त्यांच्यात अनेक बाबतीत विरोधाभास दिसून येतो. वन्यजीव कायदा हा लोकांपासून निसर्गाचे संरक्षण करतो, तर वनाधिकार कायदा लोकांना - या जंगलाचे प्राचीन वननिवासी असलेल्यांना – हळुवारपणे परंतु निश्चित आणि कायदेशीररित्या जंगलाचा उपयोग करण्याची परवानगी देतो.

वन संवर्धन क्षेत्रात कायम वापरले जाणारे 'अवैध शिकार', 'अतिक्रमण', 'अतिचराई' आदी शब्द या दोन कायद्यांमधील विरोधाभासाचे मोठे मुद्दे आहेत. सांस्कृतिक प्रथा मानल्या जाणाऱ्या शिकारीचे रुपांतर गुन्हा समजल्या जाणाऱ्या 'अवैध शिकारी'त कधी होते? संस्कृतीचा भाग आणि आर्थिक आधार असलेले पशुपालन 'अतिचराई'स कारणीभूत कधी ठरते? आणि फक्त एखाद्या घरात राहणे हे 'अतिक्रमण' कसे होते?

उपरोल्लेखित प्रश्नांबरोबर मला आणखी एक प्रश्न पडतो तो असा की जंगलात जाण्याची परवानगी देणारा वनाधिकार कायदा लोकांच्या ज्ञानाधिकाराचा संबंध त्यांच्या – रस्ते, पाणी, वीज, शाळा किंवा हॉस्पिटल आदी पायाभूत सुविधांच्या विकासाच्या हक्काशी का जोडत नाही? या सुविधांशी संबंधित असलेल्या विकासाच्या हक्काचा वनाधिकार कायद्याच्या कलम 3.2 मध्ये समावेश आहे. लोकांना जंगलाविषयीच्या त्यांच्या पारंपरिक ज्ञानाच्या संवर्धनाचा अधिकार देणाऱ्या कलम 3.1(i) आणि (k) पासून हे कलम स्पष्टपणे वेगळे करण्यात आले आहे. इथे मला विचारावेसे वाटते की एखाद्याच्या पारंपरिक ज्ञानाचे संवर्धन न करता त्याला औपचारिक शिक्षणासाठी शाळा देण्यात काय अर्थ आहे?

यांसारखे प्रश्न मला (आणि आशा आहे तुम्हाला सुद्धा) त्रस्त करत असताना मला लिटल आणि ग्रेट निकोबार बेटांच्या आदिवासी परिषदेने ऑगस्ट २०२२ मध्ये केलेले एक विधान नमूद करावेसे वाटते, "आमच्या मनात या बेटांविषयी अतीव आदर आहे कारण यावर आमच्या पूर्वजांच्या आत्म्यांचा वास आहे. आमच्या प्रथा आणि परंपरांमुळे या बेटांवरील जीवनाची अखंडता कायम राहिली आहे. आम्ही धंदा म्हणून शिकार करत नाही... आम्ही इथल्या संसाधनांचे अतिशोषण आणि या बेटांचे नुकसान करू शकत नाही... या वन्यजीव प्रजाती आमच्या समुद्र किनाऱ्यावर कशा टिकून राहिल्या हे आम्हाला कधीही विचारण्यात आले नाही... वन्यजीव अभयारण्य ही संकल्पना उदयाला यायच्या खूप आधीपासून आम्ही त्यांच्या सोबत राहत आलो आहोत."

- **सृष्टी सक्सेना**
पॉलिसी अॅडव्होकसी ऑफिसर, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई. s.srishti@hotmail.com
भाषांतर – **परीक्षित सूर्यवंशी**

For private circulation/Printed Matter

To

From: **Kalpavriksh,** Apt. 5, Sri Dutta Krupa, 908 Deccan Gymkhana, Pune 411004